डॉ. स्मिता दामले

# रक्षा

ई साहित्य प्रतिष्ठान

# रक्षा

डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

रक्षा (Raksha)

कथासंग्रह

लेखिका : डॉ. स्मिता दामले

Email :- smitasuhas67@rediffmail.com

Ph : 9867364634 / 020-25451089

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ जून २०१४ (झाशीची राणी लक्ष्मीबाई हौतात्म्यदिन)

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

अर्पणपत्रिका

या देशाचे आणि येथील सामान्य
लोकांचे रक्षण करताना ज्यांच्या
संसारांची राखरांगोळी झाली त्या
सर्व राजकीय सामाजिक आर्थिक
कार्य करणार्‍यांना हा कथाकलश
सादर अर्पण

डॉ स्मिता दामले

“रक्षा”

माणुस रक्षतसे रक्षा ... राखत राख चिमुटभर
त्याची संपत्ती माया सांप्रत राख चिमुटभर

संस्कृतीचे रक्षक आणि सुधारक तुंबळ करती
कालच्या फुलांची भूमित चिरडत राख चिमुटभर

रक्षा करणारा हात हृदय अंगारा ज्यांचा
“जीवा”भावाचे दोस्तच रक्षत राख चिमुटभर

कुणी केली संसाराचि राख रांगोळि स्वतःच्या
श्रम त्यांचे होतील रक्षक किंमत राख चिमुटभर

डॉ. स्मिता दामले यांचा ‘रक्षा’ हा कथासंग्रह म्हणजे वाचकांना एक नवीन अनुभूती देणारा, विचारांना चालना देणारा संग्रह आहे. यात एकूण सात कथा आहेत. यातली प्रत्येक कथा एका प्रमुख व्यक्तीभोवती गुंफलेली आहे. त्यांचा शेवट गंभीर, चटका लावणारा आहे. पहिलीच कथा ‘क्षणभंगुर’ वाचताना इतका गुंगून गेलो की कथा वाचून कधी संपली हे कळले देखील नाही! मग दुसरी, तिसरी असे करत सगळे पुस्तक एका बैठकीत वाचून संपवले.

पहिल्या कथेतील पात्र नानासाहेब, ज्यांनी अत्यंत समृद्ध जीवन जगलेले असते. एका मोठ्या राजेशाही वाड्यात राहणारे नानासाहेब व त्यांची पत्नी आयुष्याच्या एका वळणावर निवृत्ती स्वीकारून सत्संगात वेळ घालवायला हृषीकेशला जाण्याचा निर्णय घेतात व सगळी निरवानिरव करतात. त्यांचा मुलगा परदेशात कायमचा स्थायिक झालेला असतो. या कथेचा शेवट अतिशय हृद्य, मनाला चटका लावणारा केला आहे. ‘एक लाख रुपयांची राख’ हे काय आहे ते सांगून तुमची उत्सुकता कमी करीत नाही.

अतिशय वेधक वर्णन, समृद्ध भाषाशैली आणि अनुभवाचे बोल यांचा ठायीठायी प्रत्यय येतो. उदाहरणार्थ

“दान दिलेल्या वस्तूवर कधी हक्क सांगू नये”

“संसारातून निवृत्त होण्यातच शान आहे”

“बायकांनी वटसावित्री करण्यापेक्षा पुरुषांनी दरवर्षी एक वडाचं झाड लावावं. कारण वडाचं झाड दर तासाला पाण्याचा वाफारा हवेत सोडतं”

“गुणाचे लोक खूप असतात ..पण प्रत्येकाच्या पदरी यशाचं माप मात्र वेगवेगळं पडतं“

“प्रत्येक श्रोता स्वत:ही गायकाबरोबर मनात आलापी करत असतो, पण जेव्हा त्याला गायकासारखी एखादी जागा घेता येते तेव्हा तिथे बहोत अच्छे म्हणायचं”

“सुंदर सजवलेला दिवाणखाना तसा रिकामा नाहीये. अनेक विचारवंतांचे शब्द, गायकाचे सूर इथे अजूनही रेंगाळतायत!

अशा सुंदर विचारांची पखरण सर्वत्र पसरलेली आहे.

या संग्रहातल्या साऱ्याच व्यक्तिरेखा विलक्षण वेगळे जीवन जगल्या आहेत. त्यांचा शेवटही चटका लावणारा आहे.

तुम्ही ह्या कथा वाचा आणि स्वत:च अनुभव घ्या असेच मी आग्रहाने म्हणेन.

रत्नाकर महाजन - विलेपार्ले

डॉ स्मिता दामले यांच्या सात कथांचा ‘रक्षा ‘ हा संग्रह.

अगदी पहिल्याच ‘ क्षणभंगुर’ या कथेपासून मनाची पकड घेणारी अशी स्मिता दामले यांची शैली जाणवत रहाते. विशेष म्हणजे ही शैली कथेला अनुकूल असे रागरंग धारण करते. पहिल्या कथेतील अत्यंत सधन आणि त्याच वेळी खऱ्या अर्थाने सुसंस्कृत अशा नानासाहेबांनी आपल्या संपत्तीचा केलेला विनिमय मनाच्या श्रीमंतीबरोबरच वैराग्याचा साक्षात्कार घडवणारा आहे. नानासाहेबांच्या घरातील ऐश्वर्याचं , आयुष्यातील अद्भुत घटनांचं , विचारांचं वर्णन पकड घेणाऱ्या प्रतिमांच्या वापरातून लेखिका करते.

‘घर सर्व दागिने उतरवून ठेवलेल्या श्रीमंत सुंदरीसारखं साधं दिसत होतं ‘’.. एकाच वाक्यात केवढातरी आशय लखाखून जातो. कथेचा शेवट एखाद्या रंगलेल्या मैफिलीसारखा मनात रेंगाळत रहातो..

पुढची कथा ‘अंगारा ‘ सामान्यातील असामान्यत्वाची कथा आहे. निवेदिका आपल्या नुकत्याच गेलेल्या आईबद्दल बोलते आहे. एक शांत अलिप्त स्वर. पण या स्वरात मांडलेला एका आयुष्याचा अनुभव नितांत तेजस्वी आहे. त्यातून साध्या गृहिणीच्या जीवनात दडलेली शाश्वत सौंदर्यमूल्यं आणि उदात्त जीवनादर्श आपल्यासमोर उलगडत जातो. त्या आईची काटकसर,सौंदर्यासक्ती, तिची श्रद्धा, दृढ निर्धार.. स्त्रीजीवनातच अशी सूक्ष्म आणि समृद्ध जाणीव जोपासली जाऊ शकते याची मनाशी खूणगाठ पटते. आधीच्या कथेपेक्षा खूप वेगळा वाण घेऊन आलेली ही कथाही वाचकांच्या मनाचा ठाव घेईल अशीच आहे.

‘उल्का ‘ ही पुढची कथा अगदी वेगळी, जीवनातल्या असुंदराशी झगडत निराशेने मृत्यूला जवळ करणाऱ्या अभागी स्त्रीची आहे. तिच्या संघर्षाची राख करणाऱ्या व्यवस्थेचीही ही कथा आहे. सुन्न करणारा हाही जीवनानुभव लेखिका समर्थपणे उभा करते. रूप ही मुंबईत हिंदी सिनेसृष्टीतील मॉबसीन मध्ये काम करणारी आणि मग अटळपणे जगण्यासाठी देहविक्रय करणारी स्त्री. पण ‘अनीती हीच नीति’ असलेल्या या जगाचेही नीतीनिकष असतात. त्यासाठी रूपसारख्या स्त्रिया बेडरपणे झुंजत असतात. शेवटचा वर्मी घाव बसेपर्यंत लढतात. लेखिका हे चित्र विदारकपणे उभे करते.

यापुढची कथा ‘कोंदण’ - ऐतिहासिक काळात आपल्याला घेऊन जाते. मावळ्यांच्या रांगड्या प्रेमळ भाषेत त्यांचे जग चितारते. जिवा महाला आणि शिवराय यांच्यामधला भावबंध उलगडते. त्यातून स्वराज्याच्या जाणिवेने पेटलेला, शिवाजीराजांवरच्या प्रेमासाठी तळहातावर शीर घेणारा भाबडा मावळा आपल्यासमोर उभा रहातो.

‘मनु आणि मोना ‘ अशीच एक कथा. संपन्न घरातल्या बालविधवेचं भयाण ओसाड आयुष्य, ते समजून विव्हल होणारी आसपासची मातृहृदयं. शेवटी स्त्रीची वेदना स्त्रीलाच कळते.. समाजाने बनवलेल्या अन्यायी नियमांमधून एका कोवळ्या जिवाला सूट कशी द्यावी हे जाणत्या

सहृदय स्त्रियांना कळत होते हा संदेश देणारी ही कथा शेवटी आजच्या विमुक्त स्त्रीजीवनावर येते तेव्हा हे स्वातंत्र्य मिळवण्याआधी किती मुक्या कळ्या उसासत निर्माल्य झाल्या आहेत याची जाणीव लेखिका आपल्याला करून देते..

'देवच तुमचे रक्षण करो' हा एक कल्पनाविलास आहे. तंत्रज्ञानाने समृद्ध पण आत्मिक समृद्धीला वंचित झालेला आजचा महाराष्ट्र स्वर्गातले दिवंगत मराठी महानुभाव पहात आहेत , व्यथित झालेले आहेत . उपहासिक शैलीचा अवलंब करत ही कथा लेखिकेने विकसित केली आहे..

शेवटी, एक संपन्न वाचनानुभव वाचकांना देण्यात लेखिका यशस्वी झाल्या आहेत.. कथेच्या तंत्राचा बडिवार न करता आशयाचे वेगवेगळे सखोल प्रत्यय त्यांनी वाचकांना दिले आहेत हे विशेष आहे असेच म्हणावे लागेल.

भारती बिर्जे डिग्गीकर

# कथानुक्रम


क्षणभंगूर

अंगारा

दधीची

उल्का

कोंदण

मनु आणि मोना

देवच तुमचं रक्षण करो

# क्षणभंगुर.

नानासाहेबांनी आपल्या पुढ्यातल्या कागदांवर सह्या करून, हातातलं जुनं, उंची पार्कर पेन गुळगुळीत सागवानी टेबलावर ठेवलं, तेव्हा त्यांच्या हातातल्या अंगठीतला हरभऱ्याएवढा मोठा हिरा मंदावलेल्या सूर्यकिरणांमधे लख्खकन् चमकला. नानासाहेबांच्या समोर बसलेल्या वकीलानं मग ते कागद गोळा करून तिलोत्तमादेवींच्या पुढ्यात ठेवले. आपल्या डोक्यावरून येणाऱ्या पदराचे हिरवे जरीचे काठ डाव्या हातांनी घट्ट ओढून घेत, त्यांनी आपल्या उजव्या हातातली पाचूची बांगडी मागे रेटली आणि वकीलांनी सांगितलं त्या जागी सही केली.

नानासाहेब आणि त्यांच्या पत्नी मग सोफ्यावर मागे रेलले. नानासाहेबांनी साऱ्या दिवाणखान्यावर आपली नजर संथपणे फिरवली. आपल्या दोन्ही हातांची बोटं आपल्या करड्या, कुरळ, विरळ केसांमधून मागे नेली आणि एक मोठा सुस्कारा टाकत तिलोत्तमादेवींना म्हणाले,

''ह्या क्षणापासून हे सारं वैभव करसेटजींचं झालं. हो ना?''

''हो! आता यातलं आपलं काहीही नाही.'' मंद हसत शालीनपणे तिलोत्तमादेवी म्हणाल्या.

''अजून विचार करा. समोर वकील बसले आहेत तोवर आपण निर्णय फिरवू शकतो आपला. ''

नानासाहेबांच्या चेष्टेने सगळे हसले. मग वकीलांनी आपल्या ब्रीफकेसमधे टेबलावरचे सगळे कागद गोळा करून ठेवले.

''धनंजय, सरबत आणा सर्वांना!''

आज्ञाधारकपणे नानांकडे पाहून धनंजयने मान हलवली आणि आत जाऊन केशरमिश्रित सरबत बाहेर आणलं. सरबत पिऊन झाल्यावर धनंजयने ते सगळे चांदीचे उंच पेले आत नेले आणि लाल रंगाच्या कागदात गुंडाळून आणून नानासाहेबांच्या हातात दिले. नानासाहेब उठले आणि त्यांनी प्रत्येक वकिलाला एकेक चांदीचा पेला भेट दिला.

''हे काय नानासाहेब?'' एकाने गोंधळून विचारलं.

''माफ करा हं! हे सगळं घर रिकामं केलं तेव्हा तुम्हा सर्वांना आमच्यातर्फे काहीतरी भेट द्यावी अशी आमची इच्छा होती. पण तुम्हाला सरबतही त्यातूनच द्यावं लागलं.

नानाहेबांच्या बोलण्यानं सारेच भारावले. त्यांनी नानासाहेबांच्या भेटीचा स्वीकार केला आणि त्यांचा निरोप घेऊन सगळे बाहेर पडले. धनंजय त्यांना सोडायला पोर्चपर्यंत गेला. घर एकदम शांत झालं. नानांनी दिवाणखान्यावर नजर फिरवली. त्यांची मोठमोठी पेंटिंग्ज काढल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर चित्रांच्या चौकटीची खूण अजूनही आठवण सांगत होती. घर, सर्व दागिने उतरवून ठेवलेल्या श्रीमंत सुंदरीसारखं साधं दिसत होतं.

' हं..' .. असं म्हणत गुडघ्यांवर हातांचा जोर देत नानासाहेब उठले आणि पश्चिमेच्या खिडकीजवळ जाऊन उभे राहिले. खिडकीबाहेर पसरलेल्या समुद्राकडे ते एकटक पाहू लागले. त्यांनी आपले हात मागच्या बाजूला गुंफले. आत येणाऱ्या धनंजयची त्यांना चाहूल लागली आणि पाठोपाठ आवाज आला..

''धनंजय,आपल्या साऱ्या लोकांना रजा दिली ना? त्यांचे हिशेब पूर्ण झाले का?'' आत येणाऱ्या धनंजयला तिलोत्तमादेवींनी विचारलं.

''हो! सगळ्यांचे सगळे हिशेब पूर्ण झाल्यावरच गेले ते. हव्या त्या वस्तू आठवण म्हणून घेऊन जायला त्यांना सांगितलं होतं. तेही काम झालं.

''काय काय नेलं त्यांनी?''

''आपल्या सैपाकाच्या नर्मदाबाईंनी पितळेचं मोठं पातेलं आणि थाळे नेले. त्यांच्याही घरात अन्नाची सुबत्ता येईल म्हणत होत्या. जयराम गड्यानं देवघरातली मोठी सतरंजी नेली. कोकणात गेल्यावर त्याच्यावर झोपेन म्हणाला. नंदलाल ड्रायव्हरनं साहेबांची चांदीची सिगारेटकेस मागितली. आणि बहादूर गुरख्यानं पैसेच मागितले.''

''नंदलालला सिगारेटकेस कशाला दिलीस? जुगारात घालवून टाकेल तो!''

''दान दिलेल्या वस्तूंवर कधीही हक्क सांगू नये.'' समुद्राकडे पाहात नाना म्हणाले.

तिलोत्तमादेवी गप्प बसल्या. आणि क्षणभराने उठून आत गेल्या.

धनंजयही काही बोलला नाही.

धनंजय हलक्या पावलांनी नानासाहेबांच्या मागे जाऊन उभा राहिला. नानासाहेब सूर्याकडे एकटक बघत होते. सूर्याचा केशरी गोळा आपल्या तेजाचा पसारा आवरत खाली खाली चालला होता. मोराचा पिसारा त्यांच्या डौलदार चालण्यात मागे रेंगाळत ओढला जात असतो तसा. चर्चच्या लग्नवेदीजवळ निघालेल्या नववधूच्या शुभ्र पोशाखाचा पसारा तिच्या मागेमागे जातो तसा. ह्या सूर्याला ह्याच खिडकीतून नानासाहेबांनी कैक वर्षे न्याहाळलं होतं. त्यांचे डोळे ह्या खिडकीच्या चौकटीच्या एक इंच वर आले होते त्या बालवयापासून! सूर्य तसाच होता, नानासाहेब बदलत गेले होते. काळ सरत असल्याची चिन्हं सूर्यच नानासाहेबांच्या शरीरावर रोज उमटवत होता.

नानासाहेबांच्या वडिलांनी वरळीचा हा समुद्राच्या किनाऱ्याजवळ बांधलेला तिसरा बंगला होता. पहिली चाळ माझगावला, दुसरा बंगला वाळकेश्वरला आणि ही तिसरी सुंदर वास्तू वरळीला. .. ..!

सूर्यबिंब दिसेनासं झालं. नानांनी तंद्रीतून बाहेर येत नजर आत वळवली.

''हे घर सोडून जायचं म्हणून वाईट वाटतंय का?'' धनंजयने मृदुपणे विचारलं.

''..अं?..'' भानावर येत नानांनी विचारलं?

''काही नाही! इतकं सुंदर सजवलेलं घर कुणाला तरी देऊन टाकायचं म्हणजे कठीणच नाही का?''

नाना किंचित हसले. आणि दिवाणखान्यात फेऱ्या मारायला लागले.

''नाही धना! माझ्या साऱ्याच गोष्टींचा मी त्याग करतोय हे विसरलास की काय? माझा एवढा भरभराटीचा व्यवसाय तुझ्यावर सोपवून मी मुक्त होतोय. तुझ्यासारखा गुणी मुलगा मी शिकवून तयार केला आणि त्याच्यावर सगळा भार टाकून निवृत्त होतोय यातच मला समाधान आहे. तू मला विद्याधरसारखाच. त्याला शिकवलं, मोठं केलं आणि मार्गारिटला देऊन टाकलं. ती दोघं इंग्लंडमधे सुखाने संसार करतायंत. त्या पुत्रप्रेमाच्या पाशातूनही मी मला मोकळं करून घेतलंय ना?''

''तसं नाही नानासाहेब! मलाही तुमच्याजवळ असलं की वडिलांजवळ असल्यासारखंच वाटतं. पण हे घर, ह्या सुंदर कलाकृती, हा तुमच्या कलासक्त मनाचा आविष्कार आहे. म्हणून वाटलं की, तुम्हाला जड जात असेल कदाचित.''

''नाही. मला खरंच कठीण जात नाहीये. कारण खूप उपभोग घेतलाय मी या घराचा, ऐश्वर्याचा. घरी येणाऱ्या पाहुण्यांनी माझ्या या रसिकतेचं, वस्तूंचंही खूप कौतुक केलंय. त्यानं माझं मन तृप्त आहे, भरून पावलंय. उलट हा बंगला सुस्थळी पडला म्हणून समाधानच वाटतंय मला.''

''हो, पण वाळकेश्वरचा बंगला विकला त्यादिवशी तुम्ही असे गप्प गप्प नव्हतात.''

''असा समज तुझा तूच करून घेतलायंस. मी अगदी निर्लेपपणे या सगळ्या वस्तू विकतोय. विद्याधर आणि मॅगी आता कधीही भारतात परतणार नाहीत ही अगदी सूर्यप्रकाशाएवढी स्वच्छ गोष्ट आहे हे मला माहीत आहे. इंग्लंडमधली मार्गारिट आमचे हे जुने दागिने- चिंचपेट्या, तनमणी, कंबरपट्टा कधीही घालणार नाही, हे तुलाही कळतंय ना? मग या साऱ्या जडजवाहिराचं पैशात रूपांतर करून बँकेत त्यांच्या नावानं ठेवणं हेच व्यवहार्य नाही का? निदान माझ्या या वस्तूंचं मोल मी जाणतोय म्हणून मी करीन ते विचारपूर्वकच करीन. आता आमच्या दोघांच्या अंगावर जे दागिने राहतील तेवढेच मागे उरतील. आमच्या मृत्यूनंतर ते आश्रमाचे होतील. विद्याधरची दुसरी संपत्ती म्हणजे आम्ही दोघं. आम्हीच सत्संगात वेळ घालवायला हृषीकेशला जाऊन राहिलो म्हणजे तोही त्याचा प्रश्न मिटला.'' नानासाहेब बोलायचे थांबले आणि सोफ्यावर बसले.

''पण तुम्ही जड झालायत असं विद्या मला कधीच म्हणाला नाही. विद्या आणि मी बालपणापासूनचे मित्र आहोत आणि तुमच्या हाताखाली मी इतकी वर्ष धडे गिरवतोय, उलट तुम्हाला इंग्लंडला घेऊन जाण्याबद्दलच तो नेहमी बोलत असतो.''

''खरंय तू म्हणतोस ते! पण आपणहून संसारातून निवृत्त होण्यातच शान आहे असं वाटतं आम्हाला. तरुणांच्या हाती कारभार द्यावा आणि सल्ल्यापुरतं राहावं .. तेसुध्दा कुणी विचारला सल्ला तरच.. असं वाटतं आम्हाला. ..ते जाऊ दे! मगाशी काय म्हणत होतास तू? वाळकेश्वरच्या घराच्या वेळी मी इतका गप्प नव्हतो ना?''

धनंजयने हसून मान डोलावली.

''थोडं तथ्य असेल कदाचित त्यात असं आता वाटतंय मला. कारण तो बंगला आईचा आणि हा माझा असा अलिखित करारच होता आमच्यात..''

''अशी वाटणी कशानं झाली?''

''अरे.. मोठीच गंम्मत होती ती! आमची आई श्रध्दाळू.. घरात कुणी ना कुणी महाराज, स्वामी, मुक्कामाला असायचेच..''

''आणि तुमचे वडील? अप्पासाहेब?''

''.. ते? आस्तिक होते पण अंधश्रध्द नव्हते. रोज रात्री दासबोध वाचल्याशिवाय झोपायचे नाहीत ते.. मनोबल वाढवण्याचं टॉनिक म्हणायचे ते त्याला.. मी पापच करत नाही तर मनःशांती कशानं कमी होणार माझी असं म्हणायचे. आईला मात्र त्यांनी कधीही दुखावलं नाही. तिच्यामुळे त्यांचा पैसा अन्नदानात, सत्कारणात खर्च होत असे ते त्यांना फार आवडे... ते काय म्हणत माहीत आहे धना? ते म्हणत, पोटभर खायला घातल्यावर माणसाच्या तोंडून जे आशीर्वाद निघतात ना, ते त्याला हिऱ्याची अंगठी दिल्यावरही निघत नाहीत. कितीही वाईट माणूस असला ना, तरीही त्याच्या तोंडून निदान वाईट तरी निघत नाही काही.. अप्पासाहेब आईबरोबर श्रावणातल्या सोमवारी बाबूलनाथला जात आणि बरोबर नेलेलं दूध बाहेरच्या भिकाऱ्यांना प्यायला देत आणि आई आत शंकरावर अभिषेकाला देई. .. बायकांनी वटसावित्री करण्यापेक्षा पुरूषांनी दरवर्षी एक वडाचं झाड लावावं असं त्यांचं म्हणणं होतं. कारण वडाचं झाड दर तासाला पाण्याचा वाफारा हवेत सोडतं. ..हा त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन ते प्रत्येकाला सांगत..''

''पण तुमचाही देवावर विश्वास नाही ना?''

''खरं सांगू का धना, ज्याला लोक देव म्हणतात ना, त्याला मी नियती म्हणतो ..म्हणजे काहीतरी अदृष्य सुपरह्यूमन पॉवर.. मला समाजप्रबोधन करणारे रामदास आणि स्वच्छता शिकवणारे गाडगे महाराज जास्त भावतात..आईचं बालपण, तो काळ, हा देवपूजेचे, श्रध्देचे संस्कार करणारा होता. त्यातून मी त्यांना दहा वर्षांनी झालो, त्यामुळे तिची नवससायास, पूजा, साधूसंत यांच्यावरची श्रध्दा आणखीनच वाढली. एकदा एका स्वामीने मूल होण्यासाठी आईला एक पुडी खायला सांगितली.. ''

''अप्पासाहेबांना चाललं ते?''

''अरे, त्यांचं डोकं तर आणखीनच  चाललं. त्यांनी आईला सांगितलं की आपण ती पुडी केमिकल अॅनॅलिसिस करून आणू आणि त्यावरून आपणच पुड्या बनवून इतर समदु:खी बायकांनाही देऊ..ते खंत करत बसणारे नव्हते. पण मुळातच ते नशिबवानच होते. भाग्यलक्ष्मीनं बोट धरून चालवल्यासारखं आयुष्य चाललं होतं त्यांचं. .. ''

''असं कसं? हुशार होते, मेहनती होते..''

''अरे असे गुणाचे लोक खूप असतात.. पण प्रत्येकाच्या पदरी यशाचं माप मात्र वेगवेगळं पडतं..अप्पा त्यांच्या वडिलांच्या मित्राकडे आले की नियतीनेच त्यांना बोलवून घेतलं ते माहीत नाही. लहान गावात भावांबरोबर राहणारे मुंबई बघायला म्हणून वडिलांच्या मित्राकडे, जगन्नाथरावांकडे अठराव्या वर्षी आले आणि येऊन दोनच दिवस झाले होते, तर त्यांना जगन्नाथरावांचे एक मित्र भेटले. त्यांचा कापडाचा व्यापार होता. ते जगन्नाथरावांना भेटायला आले होते पण त्यादिवशी अप्पा घरात एकटेच होते. त्या व्यापाऱ्यानं सगळी चौकशी केली आणि अप्पांना दुसरे दिवशी आपल्या दुकानात कामाला यायला सांगितलं.. अप्पासाहेब दुसरे दिवशी बरोबर नऊ वाजता त्या दुकानापाशी गेले. तर त्याचे मालक दुकानाच्या फळ्या उघडण्यासाठी स्वत:च पुढे उभे होते. त्यांनी आपला पाय पायरीवर ठेवला, तो एका लिफाफ्यावर पडला! मालकांनी लिफाफा उघडून पाहिला तर आत चक्क दोनशे रुपये. मालक भांबावले. त्या पैशांचं काय करावं ते त्यांना कळेना.. अप्पासाहेबांना ही कळेना काय करावं ते..

''कुणी विचारत आलं तर आपण हे पाकीट देऊन टाकू.'' असं म्हणत मालक आत शिरले. धनंजय, त्या काळात दोनशे रुपयांना प्रचंडच किंमत होती. मालक मनातल्या मनात खूष झाले. ह्या नवीन माणसाचा पायगुण भलताच सुदैवी ठरला कारण ते पैसे न्यायला कुणी आलंच नाही. अप्पा या नवीन कामात मनापासून रमले.

दीडएक वर्षात त्यांनी या व्यवसायातल्या खाचाखोचा जाणून घेतल्या. आपल्या दुकानाच्या पिंजऱ्यात राहाणारा हा पक्षी नव्हे हे त्या मालकाला लवकरच उमगलं आणि झालं ही तसंच. अप्पांनी स्वत:चाच व्यवसाय सुरू केला. त्यांनी आपली मिळकत कशात ठेवली माहीत आहे? मालकाने दोनशे रुपये काढून एक दिवस ते पाकीट टाकून दिलं होतं ते त्यांनी उचलून घरी आणलं आणि त्यात पहिली कमाई ठेवली कारण त्या पाकिटानं त्यांना खूप पैशांचं दर्शन पहिल्यांदा घडवलं. शिवाय त्यांच्या नोकरीचाही तो पहिला दिवस होता, त्याची आठवण म्हणून. ते रोजची कमाई आधी त्यात ठेवत आणि मग दुसरीकडे हलवत. खूप पैसा मिळवला अप्पांनी. तीन घरं बांधली. ''

नानासाहेब बोलायचे थांबले. त्यांनी उठून दिवे लावले.

''मग हे घर तुमचं कधी झालं?''

''हे घर आमच्यासाठी म्हणून नाही बांधलं.. सगळीकडे आईचाच पसारा होता. आधी हे घर झालं. तेव्हा आम्ही लहान होतो. मग एक चाळ माझगावला बांधली. एक घर वाळकेश्वरला. आम्हाला चित्र, शिल्प, संगीताचे जलसे, यांची फार आवड होती.

"लेखक, चित्रकार, गायक यांच्याशी आमच्या ओळखी वाढायला लागल्या, त्यांना घरी बोलवावसं वाटायला लागलं. प्रवासातून येतांना आम्ही सुंदर वस्तू आणायच्या पण ठेवायच्या कुठे? सगळीकडे आपल्या आईच्या रामकृष्णाच्या

तसबीरी. एखादे दिवशी शास्त्रीय संगीताची मैफल करावी म्हणावं तर नेमके कुणीतरी महाराज घरी उतरलेले.. शेवटी एक दिवस आमचं आईशी भांडण झालंच.. मी रागानं आईला म्हटलं,

''आम्हालाही मित्रांना बंगल्यावर न्यायचं असतं.. पण सारखे तुझे महाराज तिथे.. तुला कंटाळा नाही का येत सारखं सारखं रामायण-महाभारत ऐकून?''

''का? तेच तेच राग ऐकून तुला येतो कंटाळा?'' आईही रागावली होती.

''तेच तेच राग? अगं, एकच राग पण घराणी वेगळी आणि रागाचा ढंगच मग वेगळा.. कृष्णाच्या त्याच त्याच वाक्यांसारखं नसतं त्यात.. '' मीही रागाने म्हटलं.

''तीच तीच वाक्यं म्हणतोस? मग तुझ्या त्याच त्याच चिजा नसतात वाटतं?'' कमी नव्हती आमची आई! ' आईच्या आठवणीने नानासाहेब हसत म्हणाले.

''मला तर शास्त्रीय संगीतातलं काहीच कळत नाही. तुम्ही ते 'क्या बात है' कधी म्हणता तेच कळत नाही मला.. एक मात्र खरं एकदा गाणं सुरू झालं की साहेब आणि शिपाई हे नातंच उरत नाही हे मी पाहिलंय.'' धनंजय म्हणाला.

''एवढं गाण्यातलं कळत नाही म्हणतोस तरी हे मात्र बरं लक्षात आलंय तुझ्या. ' व्वा, बहुत अच्छे' कधी म्हणायचं माहीत आहे? मी सांगतो तुला. प्रत्येक श्रोता स्वतःही गायकाबरोबर मनात आलापी करत असतो, पण जेव्हा त्याला गायकासारखी एखादी जागा घेता येत नाही ना तेव्हा तिथे बहोत अच्छे म्हणायचं. ही अगदी सोपी ओळख बरं का?''

''मग मी तर सारखंच व्वा म्हणत बसेन.''

''असं झालं तर लोकही तुला वाऽऽ करून रागावतील ना!''

नानांच्या या वाक्यावर दोघेही खळखळून हसले.

''बाकी काही म्हण हं धना. दोन्ही रागांमधे खूप साम्य आहे..दोन्हीत वादी-संवादी आहेत, तार सप्तक आहे, वक्र राग आहे, संतापानं दोघंही एकमेकांची लक्षणगीतं गातात.. असो. हे झालं विषयांतर. तर त्यादिवशी आमचा वाद चालू असतांना अप्पा ही तिथे होतेच.

मी त्यांना म्हटलं,''अप्पा तुम्हालासुध्दा कंटाळा येईल ना हो, तेच तेच रामायण ऐकून?''

तर अप्पा म्हणाले,' मला माझा उद्योगच रामायण-महाभारत आहे. 'सांडी हे मूर्खपण। उठी घेई चापबाण। संग्रामी हे कवण। रुदन तुझे।' हे ज्ञानियांनी म्हटलेलं सार उद्योगात वापरलं. व्यवसायात लढलो पण रडलो नाही. फक्त कर्मयोग करायचा, मग निवृत्तीयोग!''

आई मग त्यांच्याशीही भांडली. ''आधीच अमरेंद्र नास्तिक, त्यातून तुम्ही त्याला आणखी बिघडवताय,'' म्हणाली. पण त्याच दिवशी हे घर माझं झालं. आणि वाळकेश्वरचं घर आईचं झालं.

''तुमच्या रसिकतेचा आनंद होता का त्यांना?''

''अप्पांना जुन्याच घरात राहायला आवडायचं आमचं ऑफीसही तिथून जवळच होतं. सारखं त्यांना बंदरावरही जावं लागे. त्यांनी दानधर्म खूप केला. पण स्वतःचं नाव कुठेही येऊ दिलं नाही हा गुण त्यांनी पारशांकडून उचलला. अर्धी मुंबई तर पारशांमुळेच नटलेली पाहतोस ना तू?''

''धना, हा सुंदर सजवलेला दिवाणखाना तुला दिसतो तसा रिकामा नाहीये. अनेक विचारवंतांचे शब्द, गायकांचे सूर, इथे अजूनही रेंगाळतायंत! त्या साऱ्यांच्या पावलांची नक्षी फक्त मला दिसते आहे.. मला काय वाटतं माहीत आहे धना, पैसा हे श्रीमंती विकत घ्यायचं साधन आहे, साध्य नव्हे.. चांदण्यात निथळणारा ताजमहाल पाहणं ही श्रीमंती.. तिथे पोचायला पैसा पाहिजे.. मग आयुष्यभर ती श्रीमंती आपल्याला सुख देत राहते..''

''मग तर हे घर सोडतांना तुम्हाला त्रास होणारच! तसं बघितलं तर , नानासाहेब, तुमच्या आयुष्यात कठीण, परीक्षा घेणारे प्रसंगही कधी आले असं मला वाटत नाही.''

''आले तर! जगणं म्हणजे त्याचीच वीण का! एक टाका उलटा, एक टाका सुलटा. आणि त्यातून व्यवसाय म्हणजे ऊन-सावलीचा खेळ..पण मी त्या संकटांकडे आलिप्तपणे पाहिलं. आपल्याला न आवडणारे पाहुणे अचानक आपल्या घरात घुसतातच की नाही? आपण तोंड वाकडं करतो का? तशीच ही दुःख! येतात, कंटाळून जातात..पण एक खरं.. हा समुद्र म्हणजे माझा प्राण आहे. त्याच्याशिवाय मला नाही करमायचं.. माझा मित्र आहे तो..''

''मित्र..? धनाने आश्चर्याने विचारलं.

''हो! धना तू कधी जमलं तर एकटा चार-पाच वेळा रात्रीच्या वेळी समुद्रासमोर बस. शांत वातावरणात.. जवळ कुणीही नाही..खळाळणाऱ्या लाटा.. फक्त आकाशात एक रात्र..काही तारे.. वाहाणारं वारं.. आणि तू.. मग बघ.. तुला समजेल की तुझ्यात आणि समुद्रात खूप साम्य आहे..तूही एकटा..तोही.. तुझ्या शरीरात एक मोठं चलनवलनाचं विश्व ..त्याच्याही अंतरंगात मोठं विश्व, त्यालाही कुणाला तरी पाहून उचंबळायला होतं, पण तोही मर्यादा सोडून वागणं म्हणजे हाती वाळूशिवाय काही नाही, ते जाणतो.. अगदी आपल्यासारखंच, त्यालाही वादळं, भरती-ओहोटीचे दिवस येतात-जातात, त्याच्या मनातल्या विचारांचा गाज आपल्याला ऐकू येतो की नाही? अगदी आपण आपल्या मनाशी कित्येकवेळा बोलत असतो तसंच.. त्याच्या अंगावरून जाणाऱ्या गलबतांसारखी स्वप्नांची गलबतं आपल्याही मनातून जात असतात.. काही पार किनाऱ्याला लागतात..काही बुडतात..मग तुला कळेल की तू आणि समुद्र सारखेच आहात..''

''बाप रे! मी समुद्राकडे असं पाहिलंच नव्हतं..''

''मग आता बघ..! नाना हसत म्हणाले.

''हं.. तर काय सांगत होतो..खरी परीक्षा झाली ती आमच्या लग्नाच्या वेळी. हिच्याशी माझं लग्न ठरलं..सहा महिन्यांनी लग्न व्हायचं होतं. कारण थाटात करायचं तर तेवढी फुरसत पाहिजेच. घरात जोरात तयारी सुरू झाली. आणि अचानक हिला ताप यायला लागला, तब्येत दिवसेंदिवस बिघडायला लागली. निदान झालं आणि टी.बी. निघाला. सगळ्यांना भयंकर धक्काच बसला. घरातल्या लोकांनीच काय पण हिच्या माहेरच्या लोकांनीही आम्हाला येऊन सांगितलं

की लग्न मोडा, नव्हे आग्रहच केला.. अप्पा-आई दोघंही निराश झाले, काय करावं ते त्यांना कळेना. माझ्या मनाची काय अवस्था आहे हे जाणून घ्यायचंही धाडस होईना..

मग एक दिवस मीच विषय काढला. ती बरी होईपर्यंत मी थांबणार आहे असं निक्षून सांगितलं. त्या काळात क्षयाचं दुखणं फार गंभीर होतं..हे दुखणं मला झालं असतं तर तिच्या घरच्या लोकांना लग्न मोडायला सांगितलं असतंत का असं विचारलं.. दोघंही हमसून हमसून रडायला लागली.. अप्पांनी मला घट्ट मिठी मारली.. फार श्रीमंत आहेस असं स्फुंदत स्फंदत म्हटलं.. आजही त्यांच्या घट्ट मिठीची पकड मला जाणवते आहे...परदेशातून उत्तम औषधं आणली, मी लग्नासाठी थांबतोय हे ऐकल्यावर हिच्याही मनावर मोठा परिणाम झाला आणि जगायच्या बळाने ती त्यातून बाहेर आली...धना, आमच्या सासऱ्यांनी खरोखर माझे पाय त्यांच्या अश्रूंनी भिजवले तेव्हा मी देवाचे फार आभार मानले, कारण दुसऱ्याची संवेदना जाणण्याची फार मोठी देणगी त्याने मला दिली होती. आणि काय पाहिजे? आमची बायको त्या दुखण्यातून सुदृढ होऊन उठली, आमचा संसार सुरू झाला.

धना,...चांगलं वागायचीसुध्दा एक नशा असते..पण त्याने फक्त स्वत:लाच नाही तर सगळ्यानांच बरं वाटत असतं हे मी पक्कं ओळखलंय..मला तोच नाद लागलाय..तोच नाद जपलाय आयुष्यभर..धनु, एक लक्षात ठेव. संसार नेहमी हॉकी खेळल्यासारखा करायचा.. नेहमी चेंडू टोलवत..वाचवत.. खेळवत पुढे न्यायचा.. दुसरा पायात पाय घालतोय म्हणून रडत बसायचं नाही.. कळलं ना..?'' खोः खोः हसत धनंजयानं मान डोलावली. तिलोत्तमादेवीनीही हसून त्याला साथ दिली.

धनंजयला ही कहाणी नवीनच होती. हे नानासाहेब त्याला ठाऊकच नव्हते..

''आता कळलं ना तुला धना, ह्यांचं मन! मी तर देवमाणूसच पाहिलाय! पण आम्हाला हे घर सोडतांना वाईट का वाटणार नाही याचं कारण तुला उद्याच कळेल.'' तिलोत्तमादेवी त्याला म्हणाल्या,.. चला आता जेवायला बाहेर जाऊ.''

दुसरे दिवशी सकाळी तिघं लौकर उठले. आज करसेटजी बंगल्याचा ताबा घ्यायला स्वतः यायचे होते.. ..ठीक वेळेवर शेटजी आले. दोघांच्या थोड्या गप्पा झाल्या.आणि मग नानासाहेब म्हणाले,

''करसेटजी आजपासून हा बंगला तुमचा. आम्ही आता निघतो. पण एक वस्तू तिजोरीतून घ्यायची आहे''

''नानासाहेब, तिजोरी रिकामी आहे! '' धनंजय म्हणाला.

''ते तुला माहीत नाही.'' असं म्हणत नानासाहेब तिजोरीच्या खोलीत गेले आणि एक पुडी घेऊन बाहेर आले.'

''काय हाय याच्यामंदी?'' करसेटजींनी न राहवून विचारलं.

''नानासाहेबांनी पुडी उघडली आणि आत होती एक वाटीभर राख!

''कशाची राख आहे माहीत आहे?''सगळ्यांनी मान हलवली. नानांनी त्या राखेकडे पाहिलं आणि म्हटलं

''एक लाख रुपयांची राख आहे ही.''

एक लाख रूपये म्हटल्यावर सगळ्यांचेच डोळे विस्फारले.

''सांगतो, सांगतो. सगळं सांगतो. हा एक इतिहास आहे..खूप खूप जुनी गोष्ट आहे....दिवाळी होती.. मुंबईतली दिवाळी आणि त्यातून आम्हा व्यापाऱ्यांची लक्ष्मी पूजनाची रात्र.. संध्याकाळी सुमुहुर्तावर पूजा वगैरे आटोपून सगळे फटाके फोडायला अंगणात आलो. रस्त्यावरच्या प्रत्येक इमारतीत फटाके धूमधडाड वाजत होते. लक्ष्मीपूजन म्हणून सगळं घर उघडं होतं. खिडक्याही उघडलेल्या होत्या.. घर पणतीच्या दीपांनी नुसतं उजळून गेलं होतं.

आणि आम्ही असे दंग असतांना कुणाचा तरी एक पेटलेला फटाका आमच्या  माडीवरल्या मागच्या बाजूच्या अप्पांच्या खोलीत जाऊन पडला. आणि हळूहळू सगळं पेटायला लागलं. आमची घरं लाकडी.. पेट घेता येण्यासारखं सगळं जळायला लागलं. आम्हाला खूप वेळ ते कळलंच नाही ..जेव्हा खोलीतून धूर बाहेर यायला लागला तेव्हा काही लोकांच्या लक्षात आलं आणि ते आम्हाला सांगायला आले.. आम्ही सगळीच धावलो..तीनचार तास खोली  आतल्याआत जळत होती आणि आम्ही बाहेर दिवाळी साजरी करत होतो..शेजारच्यांशी गप्पा मारत होतो. '

त्यादिवशी सकाळी एका परदेशी व्यापाऱ्यानं दिलेले एक लाख रुपये मी नेहमीप्रमाणे त्या लखोट्यात घालून कपाटात ठेवले आणि मग तिजोरीत ठेवायची रीतच होती आमची. पण ब्रिटिश पध्दतीने बांधलेलं आमचं घर लाकडाचं असल्यामुळे भरभर जळलं. आगीचे बंब येऊन तरी उपयोग काय ? घरातली सगळी मात्र वाचली.

पण अप्पा आणि आईला मोठा शॉक बसला. घराची धग कमी झाल्यावर मी  अप्पांना घेऊन घरात शिरलो..सगळं मोडून जळून पडलं होतं. काही वाचलं होतं.. त्यादिवशी लक्ष्मी पूजनासाठी कपाटंही उघडी ठेवली होती. अप्पा मूकपणे त्यांच्या खोलीतलं सगळं पाहात हिंडत होते.. मग त्यांच्या कपाटाजवळ गेले.. त्यांचं कपाट काळं झालं होतं. काही कपडे अर्धवट जळले होते. .. अप्पांनी हातातली काठी आत खुपसली.. ते कपडे बाजूला केले आणि हात आत घातला आणि जळलेला लखोटा बाहेर काढला.. तिथल्याच एका कापडावर त्याचा भुगा केला. .. त्यांचे हात काळे झाले होते, आणि डोळे कोरडे..तिथे ठेवलेल्या एक लाखांची राख होती ती!.. ..आता आमचा कार्यभाग संपला.. असं म्हणत अप्पा खोलीतून बाहेर पडले..त्यानंतर वर्षभरात अप्पा गेले.. आईही गेली त्यानंतर पाठोपाठ.. ..ती **रक्षा** अप्पांनी चांदीच्या डबीत भरून ठेवली होती..

नानासाहेब बोलायचे थांबले. ती डबीही त्यांनी नुकतीच विकून टाकली होती. आणि **राख** कागदात बांधून ठेवली होती. सगळे सुन्न झाले होते. नानासाहेबांनी पुडी मिटली.

''करसेटजी, .. ही राख आता आम्ही आमच्या रक्षेबरोबर गंगेत मिसळणार.. करसेटजी .... रोज भरतीला येणाऱ्या आणि ओहोटीला जाणाऱ्या या समोरच्या समुद्रानं जीवनाचं एक कठीण सूत्र आम्हाला रोजरोज शिकवलं..अप्पासाहेबांनी कर्मयोग शिकवला.. या पुडीनं गीता शिकवली आणि या समुद्रानं निवृत्ती शिकवली.. सारं क्षणभंगुर आहे हे सांगितलं..आम्ही स्थितप्रज्ञ झालो ते या दोन्हीमुळेच..'

नानासाहेब बोलायचे थांबले. झर्रकन् वळले आणि पोर्चपर्यंत पोचलेही.. धनंजय त्यांच्यामागे धावत गेला आणि त्यांच्या पायांना हात लावायला वाकला. त्याच्या मस्तकावर हात ठेवत नानांनी आशीर्वचन म्हणत ते बाहेर पडले.

दिवाणखान्यातले लोक अजून भानावर यायचेच होते.

# अंगारा

आत्ताच ती गेली. तिच्या डोळ्यांमधून तेज बाहेर पडतांना पाहिलं मी! शांतपणे, तृप्तपणे ती कुणाबरोबर तरी निघून गेली. कधीपासून त्याची वाट पाहात होती ती! आत्ता मी तिच्या हातात हिरव्या बांगड्याच भरते आहे. माझ्या हातात हिरव्या बांगड्या हात कडक व्हायच्या आत भर असं तिनंच सांगितलं होतं मला. खूप आवडायचा तिला हिरवा चुडा. या चुड्यामुळे कायम शालीन, सभ्य वाटतं म्हणायची. म्हणूनच आठवणीने काचेच्या बांगड्या आधीच आणून ठेवलेल्या होत्या. तसं पाहिलं तर तिची ही परलोकप्रवासाची तयारी कधीच झालेली होती. मनाने आणि देहाने. फक्त वेळेची शाश्वती नव्हती म्हणून थांबली होती.

कोणतंही मोठं दुखणं सत्तरीच्या सुमाराला झालं तर औषधपाणी घेणार नाही, असं तिनं ठाम ठरवून ठेवलेलं होतं. तसंच केलंन् तिने. सत्तरीच्या उंबरठ्यावरून नुकतीच आत शिरली होती. चार महिन्यांपासून पोटात दुखायला लागलं. पचन बिघडलं. आजवर दगड घातले तरी पचवायची शक्ती असलेल्या जठराने असहकार पुकारला हेच काहीतरी विचित्र होतं. शरीर काहीतरी सांगत होतं, बोलत होतं. त्याच्याकडे लक्ष देणं भाग होतं. मग तपासण्या झाल्या. चोरपावलाने जलोदराने पोटात प्रवेश केला होता. पोटात पाणी साठायला लागणार, पाणी काढत जगत राहावं लागणार, हे चित्र स्पष्ट झालं. म्हणाली,''थोडक्यात म्हणजे विमानकंपनी ठरली. आता फक्त प्रवासाची तारीख कळायची राहिली. ती तर डॉक्टरनासुध्दा कधीही सांगता येत नाही. आता नुसतं वाट पहाणं..“ घरातल्या सर्वांनी ट्रिटमेंट घ्यायची आर्जवं केली, पण तिच्या निर्णयावर ती ठाम होती.

नोकरी करून मोठ्या पदावर असलेल्या स्त्रियांसारखी ती काही फार मोठी कर्तृत्ववान महिलांपैकी नव्हती. होती तर सामान्यच गृहिणी. पण सामान्य माणसं आपापल्या संसारापुरती महान असतात की! नाव मोठं नसलं म्हणून काय झालं? पगारांमुळे जे व्हॅल्युएशन पगारदार स्त्रीचं होतं ते घरी बसलेल्या गृहिणींचं कधीच होत नाही, म्हणून ती सामान्य. आणि लायकी नसतांना मोठ्या पगारांमुळे शहाण्या समजल्या जाणाऱ्या बायका कुठे फार हुशार असतात? ( हेही तिचंच मत ).

तिचा संसार तिनं असाच चतुराईनेच तर केला होता. खरं तर एका छोट्या खेड्यात वाढलेली ही मुलगी आईविनाच वाढली. जुना काळ तो. मुलींची लग्न लवकर व्हायची. खूप मुलंही असायची. ती सहा वर्षाची असतांना चार आणि दोन वर्षांच्या धाकट्या दोन बहिणी तिच्यावर आणि तिच्या वडिलांवर सोपवून आई परलोकी निघून गेली. बहिणी

लग्न होऊन सासरी गेलेल्या, भाऊ शहरात शिक्षणासाठी गेलेले, आता आधार होता फक्त वडिलांचाच. आणि तिला आधार होता गावातल्या मावशीचा.

कठीण परिस्थिती अभ्यास छान घेते, स्वभाव घडवते, मनाची जळमटं काढून टाकते. याचा तिलाही प्रत्यय यायला लागला, जेव्हा धाकट्या बहिणी भुकेने रडायला लागल्या, त्या चौसोपी मोठ्या वाड्यात हिंडायला घाबरायला लागल्या, त्यांचे परकर फाटायला लागले. मोठेपणा आपोआप तिच्यावर येऊन पडला. घर सांभाळायची जबाबदारी तिच्यावरच पडायची. सकाळी वडिलांबरोबर उठायची. चुलीत हात घालतांना आत विंचू तर आत बसला नसेल ना नसेल ना या भीतीने आधी लाकडाने खुडबुड करायची. बहिणींना परसात नेतांना तिथे साप तर नसेल ना याची धीटपणे पाहाणी करायची..मग वडिलांच्या म्हणजे काकांच्या पुजेची तयारी करायची.

काका वकील होते. अशिलं त्यांच्याकडे कामं घेऊन आली की ते त्याच्याशी कसे बोलतात याकडे लक्ष ठेवायची. त्या बाळकडूचा परिणाम एकच झाला, की आपोआप तिच्यात सावधपणा मुरत गेला. नेमके शब्द कसे निवडायचे, कसं उत्तर द्यायचं, कधी गप्प बसायचं, अशा काकांनी लोकांना दिलेल्या पाठांमुळे हिच्याही मनात मुत्सद्दीपणाचे अंकुर मूळ धरायला लागले. अशिलांना शिकवता शिकवता आपली लेकही हुशार होत चालली आहे हे त्यांना कळलंच नाही.

काकांना सतत भीती वाटायची की आपणही अचानक गेलो तर ही इतकी लहान ..हिच्या लक्षात कसं येणार? मग नात्यातलं कुणी वारलं की काका तिला डेड बॉडी दाखवायला घेऊन जायचे. झालं. आता काकांवर सारखं लक्ष ठेवायला लागली. एक दिवस काका पहाटे नेहमीसारखे उठले नाहीत. ही काळजीत पडली. दहावेळा माडीवर जाऊन त्यांना बघून आली. शेवटी तिचाही धीर सुटला. काकांच्या टेबलावरचं तांब्याभांडं तिनं जोरात खाली पाडलं.. काका दचकून उठले. मग तिला हायसं वाटलं..काकांना तिनं मनातली भीती सांगितली, तेव्हा काका जोरात हसले आणि म्हणाले ‘ अग, एवढ्यात मी मरत नाही.. आता एक लक्षात ठेव. माझा श्वास चालतो की नाही ते पाहायचं.. छाती पाठ खालीवर होत असली की मी जिवंत आहे समजायचं. कळलं?.. तिने मान डोलावली..आणि तेव्हापासून काकांच्या श्वासाकडे लक्ष द्यायला लागली.

बघता बघता ती १६ वर्षाची झाली. काकांनी स्थळं पाहायला सुरूवात केली. तिने काकांना सांगून टाकलं, मला शिकलेला नवरा हवा..पैसा नसला तरी चालेल.. काकांनी हसून मान डोलावली. आणि मग वर तसाच शोधला नुसता विद्वान.. सतत वाचत बसणारा.. सतत कसला न कसला अभ्यास करणारा...वेदांमधल्या ऋचांपासून गालिबचं काव्य, दोन्ही एकाच सहजतेने जिभेवर खेळवणारा..

ती संसारात रमली. चतुराईने, काटकसरीने, व्यवहारीपणाने संसार करायला लागली. ते रात्री जागून टॉल्स्टॉय वाचत बसायचे, ती पांढराशुभ्र हलवा ढवळत बसायची. त्यांना व्यवहार माहीत नाही, तिला शिक्षण.. म्हणून तर दोघं आपापल्या क्षेत्रात रमली.. पाककलेत ती कमालीची निपुण.. तिच्या हातच्या मऊसूत रेशमी पोळ्या खाऊन उठतांना पाहुणे तिला पाककलेतली लता मंगेशकर अशी सर्वोच्च पदवी देऊन मोकळे झाले. भरतकामातही ती निपुण, शिवणकलेत तरबेज, स्वतःच घरात भिंत खणून तंदूर फरशी बसवलीन्, ती कापून आणायचा उद्योगही तिचाच, ती वाहून आणायची हिंमतही तिचीच. सिमेंटने लिंपायचा उद्योगही तिचाच..आणि मग त्यावर लखलख घासलेला तांब्याचा हंडा पाणी भरून ती

त्याच्याकडे कितीतरी वेळ स्वतःच्या हुशारीवर खूष होऊन पाहात बसली.. इतक्यात हातातलं पुस्तक खाली ठेऊन ते आले, पाणी प्यायले, पण त्यांच्या लक्षात काहीच आलं नाही.. ती मात्र त्यांच्या चेहऱ्यावरची तिच्या नवीन करामतीच्या प्रतिक्रियेची वाट पाहात बसली. आणि मग फणकाऱ्याने निघून गेली. आणखी एका आवली-तुकोबांची या भूमीवर गाठ पडली होती एवढंच!

लोक आले की चहा करतांना चहाच्या पातेल्यावर भाजून ठेवलेला लाडवाचा गोळा गरम करायला ठेवे आणि तो गरम गरम लाडू पाहुण्यांना खायला देई.. पाहुणे खूष होऊन विचारत, आत्ताच केलेत का लाडू? मग ती हो म्हणत बेरकीपणे हसे. एकदा लाल तिखट आणायला गेली दुकानदाराने दोन प्रकार दाखवले आणि दोन भावही सागितले. दोन्ही फरक काय? तिनं विचारलं.

'' एक तिखट मिरच्यांच्या डेखासकट दळलेलं आहे आणि दुसरं डेखंसुध्दा काढलेली आहेत. इतकं भेसळशून्य आहे. .. तो म्हणाला.

मग ती विचारात पडली आणि त्यांना म्हणाली,

'' मग ती काढलेली डेखं ह्या कमी प्रतीच्या तिखटात मिसळलीत का?" दुकानदाराने कपाळाला हात लावत म्हटलं, ' असा प्रश्न आजवर मला कुणीही विचारला नव्हता. '

दोघांचा संसार वाढायला लागला. मुलांची त्यात भर पडलीच, पाहुणेही काही कमी नव्हते. सगळ्यांच्या सरबराईत तिचा दिवस उजाडे आणि संपे. मुलींचे लांब लांब केस धुतांना, त्यांना न्हायला घालतांना दरवेळी तिला तिच्या काकांची आठवण यायची. बालपणी ते तिचे लांब केस शिकेकाईने स्वतः धुवून देत असत हे ती न चुकता मुलींना सांगायचीच.

दिवस मागे पडले. जावई-सुना आल्या, मुली सासरी गेल्या पण शरीरातही रक्तदाब-मधुमेहासारखे पाहुणे कायम वस्तीला आले. नातवंडं घरात दंगा करायला लागली. त्यांना झोपवतांना ढुम्मा ढुम्मीची गोष्ट सांगतांना तीही रंगून जायला लागली. त्यांच्या पापण्या जडावल्या की उद्याच्या गोष्टींचा विचार करायला लागली.

आता आपल्या उत्तरायणाचा विचार करायला लागली. वडिलांना अर्धांगाने खितपत पडलेलं तिनं पाहिलं होतं. ते मरण तिला नको होतं. म्हणून तिने ठरवलं, की उशाशी झोपेच्या गोळ्या ठेवायच्या आणि अर्धांग झाला की त्या खायच्या. परत मुलींना, भाच्यांना, सुनांनाही सांगून ठेवलं की एकेकीने एकेक गोळी तिच्या तोंडात टाकावी, म्हणजे काम सोपं. मग ती कृष्णभक्तीत रमली. कृष्णावर भक्ती का तर काकांची त्याच्यावर भक्ती होती आणि तिची काकांवर. कृष्णाच्या चतुराईवर, गीतेवर..कृष्णाचा अवतार विठोबा म्हणून विठूमाऊलीवर. आणि एक दिवस साईबाबा तिला आवडले. साईभक्तीत ती रमायला लागली.

या तिच्या दुखण्याचा रिपोर्ट मुलं घरी घेऊन आली. शांतपणे तिनं तो रोग स्वीकारला. आणि आपला प्रायोपवेशनाचा निर्णय जाहीर केला. मुलांचं काही एक ऐकलंही नाही. ज्येष्ठ पौर्णिमेला श्रीयोगेश्वराच्या प्रतिमेची पूजा करून तिने आपला निग्रह अंमलातही आणला. फक्त पाण्यावर राहायला लागली. मला आषाढी एकादशीला घेऊन जायला

ये असा हट्टही कृष्णाला बोलून दाखवला. शांतपणे हात न थरथरवता आपलं मृत्यूपत्र लिहून ठेवलं. आणि वाट पहायला लागली. दिवस सरायला लागले. दिवसेंदिवस ती अशक्त व्हायला लागली.

त्यातच आषाढ लागला. आता लहान मुलाच्या अधीरतेने ती एकादशीची वाट पहायला लागली. आषाढी एकादशी आली आणि मावळली. ' जळ्ळा मेला विठोबा.' तिनं त्या अशक्त आवाजात विठूरायाला शिव्या घातल्या. खूप निराश झाली.. मग थकून झोपली.

दुसरे दिवशी सकाळी तिचा चेहरा तेजस्वी दिसत होता.' मला काल रात्री स्वप्नात साईबाबा मिरवणूकीने येतांना दिसले. मला ते न्यायला आले.' तिने अशक्त आवाजात आनंदाने सांगितलं. तिचं तसंच होतं. अचानक कुणीतरी यायचं आणि गजानन महाराजांचा प्रसाद तिच्या हातावर ठेऊन जायचं. कुणीतरी दारावर यायचं आणि म्हणायचं की तुम्ही आता पंढरपूरला जाणार. आणि मग अचानक कुणीतरी यायचं आणि पंढरपूरला येणार का विचारून तिला तिथे घेऊन जायचं. आताही स्वप्नात साईबाबा दिसल्यावर ती खूष झाली. मला शिर्डीचा प्रसाद खावासा वाटतोय.. . ती घरातल्यांना म्हणाली..

आता कोण जाणार शिर्डीला, सगळ्यांनाच प्रश्न पडला. घरातली म्हणाली. ती हिरमुसली. तो दिवस तसाच सरला. त्रयोदशी उजाडली. संध्याकाळची वेळ. दारावरची बेल वाजली. दारात उषा उभी होती. गडबडीने आत शिरली. पाच मिनिटांसाठी आले आहे आत्याला पाहायला, म्हणाली. पलंगाजवळ जाऊन तिला भेटली. झोपल्या झोपल्या तिनेही उषाला नमस्कार केला. उषाने मग आपली कापडी पिशवी उघडली, आणि त्यातून एक पुडी काढून तिच्या तोंडात एक लाही ठेवत म्हणाली,

'' कालच शिर्डीहून आले. प्रसाद आणला आहे. खा! आता नेम मोड. आणि प्रसाद खा! '' ती नाही म्हणाली. नेम मोडला असता ना? मग तिच्या कुंकवावर उषाने साईबाबांचा **अंगारा** लावला.तिच्या डोळ्यातून घळघळा आंसू वाहायला लागले. तिने हात जोडून उषाला नमस्कार केला आणि शांतपणे डोळे मिटले. तृप्त दिसली ती मला.

एकादशीनंतरचा आज चौथा दिवस. आज गुरूपौर्णिमा! आत्ताच ती गेली. साईमहाराज खरंच तिला येऊन घेऊन गेले? इतकी काळजी घेतात ते आपल्या भक्तांची? याला उत्तर नाही. श्रध्दा आणि सबुरी.. बाबांचा मंत्र.. बुध्दीच्या कसोटीवर न उतरणारं पण अनुभवाच्या पायावर उतरणारं.. तसा आपण वारा तरी कुठे पाहतो? आपणच बनवलेली यंत्रांमधली वीज तरी कुठे हातात घेऊ शकतो? फक्त अनुभवतो..

आत्ता बांगड्या भरतांनाही मला एक प्रश्न छळतोच आहे.. झोपेच्या गोळ्या घेऊन मरणाला जवळ करण्याचा तिचा विचार आधीच ठरला होता.. तर मग तो आषाढी एकादशीला तिने आपलासा का केला नाही?जाण्याचा मार्ग आपण बदलूही शकत नाही का?

माझ्या डोळ्यांमधून आईच्या जाण्याचं पाणी घळाघळा वाहतंय.

कृष्णा नाव होतं. तिचं तिच्या वडिलांनी कृष्णभक्तीमुळे ठेवलेलं.

श्रीकृष्णार्पणस्तु.

# दधीची

मेडिकल कॉलेजच्या भव्य प्रवेशद्वारातून कॉलेजचं भव्य पोर्च सहज दिसत होतं. एरवी विद्यार्थ्यांची तिथे वर्दळ असायची, पण आज मात्र एका पक्षाच्या कार्यकर्त्यांची लांबलचक रांग लागलेली दिसत होती. गावातलेही खूप लोक दिसत होते. वातावरण गंभीर..गणवेशातले स्वयंसेवक अतिशय शांतपणे शिस्तीने उभे होते. कुठेही गडबड नाही, गोंधळ नाही, जोरजोरात बोलणं नाही. रांगेत घुसणं नाही, कुणीही ढेरपोटाचे नाहीत, चेहऱ्यावर राजकारणी छटेचे नाहीत, कुणाच्याही हातात दोन-चार अंगठ्या नाहीत... रांग हळूहळू पुढे सरकत होती आणि दुसरीकडून बाहेर पडणारे लोक तसेच बाहेरही पडत होते.

त्याच रांगेत यमुना, अनंता, राममूर्ती आणि वासुदादाही उभे होते. कॉलेजच्या हॉलमधे मध्यभागी बापूंचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवलेलं होतं. शवावर फुलं घालायची नव्हती, त्याऐवजी दाराशी असलेल्या कलशात ज्याने त्याने आपल्या हाराचे-फुलांचे पैसे घालायचे होते. जमतील ते पैसे मग कॉलेजच्या हॉस्पीटलमधे उपचार घ्यायला येणाऱ्या गरीब रूग्णासाठी खर्च केले जाणार होते.

यमुना, अनंता, दादा आणि राममूर्ती ही चौघं बापूंच्या शवासमोर येऊन उभे राहिले. चौघांनीही मनापासून त्या देहाला नमस्कार केला..बापूंचं रूप अखेरचं डोळ्यात भरून घेतलं आणि ते पुढे सरकले. जेवढे ओळखीचे होते त्यांना नमस्कार करत बाहेर पडले. बाहेर पडून रस्त्याला लागेपर्यंत सगळेच गप्प होते. मग वासुदेवानेच शांततेचा बुडबुडा फोडला.

‘‘ यमुना, बापूंच्या त्या देहाला नमस्कार करतांना खूप विचार एकदम उसळून आले बघ!’’

‘‘ हो रे! मलाही काय काय वाटलं म्हणून सांगू! ‘‘

‘‘ औषधाची पूड काढून घेतलेल्या एखाद्या रिकाम्या कॅपसूलसारखं वाटलं शरीर मला ते! इतके दिवस ज्या देहाला मामा म्हणत होतो, त्यालाच आपण मामाचा देह असं परकेपणानं संबोधू लागलो, मग आपला मामा समोर दिसत असूनही तो मामा नव्हता याला काय म्हणावं तेच मला कळेना.’’ दादा म्हणाले.

‘‘ माझं तर डोकं आणखीनच भरकटलं. मामाचा ब्रेनडेथ झालाय् हे डॉक्टरांनी सांगितल्यावर त्यांच्या मृत्यूपत्रात लिहिल्याप्रमाणे त्यांचे डोळे, किडनी आणि लिव्हर सगळंच काढून घेऊन दुसऱ्या गरजू पेशंटना जीवदानच दिलं एका

परीने. .. पण त्यामुळे आतून पोकळ झालेल्या त्या देहाला नमस्कार करतांना आपलं काहीतरी चुकतंय असं वाटायला लागलं..'' यमुना म्हणाली.

'' दादा, तू त्या पार्थिवाला रिकामं कॅपसूल म्हणालास ना, तेच बरोबर वाटतंय मला तरी. '' अनंताही इतका वेळ विचारात बुडला असावा.

'' दादा, तुम्ही म्हणता तसं त्यांचं मनही त्यांच्या शरीरात नव्हतंच. '' राममूर्तींनी पुस्ती जोडली.

'' लोक तरी किती आले होते नाही अंत्यदर्शनाला ?''

'' सारी हयातच खर्च केली होती ना त्यांनी या लोकांच्या उध्दारासाठी, मग ते कसे विसरतील या ऋषीतुल्य माणसाला ?''

''अनंतजी म्हणतात ते खरंच आहे. त्यांना तरुणपण आणि वृध्दपण कधी आलंच नाही. कारण ते शारिरीक वय होतं. सेवाकार्याला वाहून घेतलेल्या माणसाच्या कार्याला कसलं आलंय वय! ''

'' बापूमामाची देहदानाची इच्छा पूर्ण झाली, तुम्ही आम्हाला बोलावून घेतल्यामुळे आम्हाला मामाचं दर्शन झालं, आज अगदी बरं वाटतंय. नाहीतर कायमची रूखरूख मनाला लागली असती.. '' यमुनाच्या डोळ्यात पाणी तरारलं.

'' बापूंना शेवटचे काही दिवस तुम्हा तिघांची भेट व्हावी असं खूप वाटत होतं पण मृत्यूने अचानक झडप घातली. ब्रेनचंच दुखणं झाल्यामुळे आम्ही काहीच करू शकलो नाही, पण बापूंना त्यांचा शेवट जवळ आलेला कळला असावा असं मला राहून राहून वाटतं..पण त्यांनी आपलं समाजकार्य कधीच थांबवलं नाही..'' राममूर्ती उदासपणे म्हणाले.

'' मामाचा जन्मच मुळी पक्षकार्यासाठी झाला. संसारात ते कधीच गुंतले नाहीत. मामा चार महिन्यांचे असतांना त्यांचे वडील प्लेगने गेले. आमची आई होती तीन वर्षाची, मामा होता चार महिन्यांचा, दोघांना घेऊन आजी माहेरी आली. तो काळ केशवपनाचा..पण कर्मठ समाजात ओलावाही होता. बाळ आपल्या आईला ओळखणार नाही, तिच्याकडे पाहून हसणार नाही, घाबरेल, म्हणून आमच्या आजीचं केशवपन तिच्या वडिलांच्या पुढाकारामुळे, झालं नाही. पुढे दोन वर्षांनी तो करूण विधी पार पडला...आई-मामा आजोळीच मोठे झाले..आजोळीच त्यांचं सारं शिक्षण झालं.'

'' मग या पक्षात ते कसे आले ? राममूर्तींनी विचारलं.

'' तो काळच भारलेला होता. प्रत्येकाला देशासाठी कुठल्या ना कुठल्या मार्गाने काहीतरी करायचं होतं. प्रत्येकाचे वैचारिक मतभेद होते, पण शत्रुत्व नव्हतं त्यात. प्रत्येक पक्षाला तळमळीचे नेते तर होतेच पण कार्यकर्तेही तळमळीचे मिळत होते. गावात एक दिवस एक डॉक्टर आले. त्यांनी राष्ट्र आणि त्याच्या कार्याची गरज यावर भाषण केलं. त्यांच्या प्रभावी विचार मांडणीने खूप लोक प्रभावित झाले. गावातल्या शाळेनेही आपले विद्यार्थी त्या सभेला नेले होते. त्यात मामाही होते आमचे.'' दादांनी एका दमात कथा सांगितली.

''आपलं भाषण संपवल्यावर त्या डॉक्टरांनी उपस्थितांना विचारलं,' पक्षकार्य करायला कोण कोण सामील होणार.' काही मोजक्या लोकांमधे आमच्या बापूमामाचा हात वर झालेला होता.'' अनंताने आठवणींची भर टाकली. बापूने

हात वर केला हे वहिनीला कळलं. बापूंच्या या विचारानं त्यांची आई आमची आजी- तिला सगळेच वहिनी म्हणायचे..बेचैन झाली...तिची कितीतरी स्वप्नं आपल्या मुलात अडकलेली होती, पण बुध्दिमान बापूंच्या मनाला डॉक्टरांच्या विचारांनी झपाटून टाकलं होतं. शाळेत सतत पहिला येणारा आपला मुलगा संसाराला लागेल, आपल्या आयुष्याला स्थैर्य येईल, माहेरी कुणाच्या तरी आसऱ्याने जगण्याचं आपलं नष्टचर्य संपेल या भविष्याचा चुराडा झाला पण वडिलांनी एक आशेचा किरण दाखवला आणि ती स्वस्थ झाली. काही दिवसांनी त्याच्या डोक्यातलं हे भूत उतरेल ही वडिलांनी दाखवलेली आशा घेऊन ती जगत राहिली.

बापू मॅट्रिक झाले. आता पोस्टात त्याला लावायचं आणि त्याच्या सोबतीने तिने राहायचं हा बेत भाऊभावजयांबरोबरच्या चर्चेनंतर घरात नक्की झाला पण तिथेही बापूंना झगडावं लागलं. त्यांना शिकायचं होतं. स्वप्नं पाहायलाही पैसा लागतो हे बापूंना तेव्हाच कळलं पण घरातल्यांच्या नाराजीकडे दुर्लक्ष करत आजी ठामपणे त्यांच्या मागे उभी राहिली आणि दोघं मायलेकरं सगळ्यांचा विरोध अंगावर घेत पुण्यात दाखल झाली. कारण तिला माहीत होतं, बापूच्या मनात एकदा आलं की आलं.. मनाचा गंभीर, अबोल, आणि सदैव वाचनात बुडलेला बापू त्याला हवं तेच करणार. बापू पुण्याच्या कॉलेजमधे दाखल झाले. स्कॉलरशिपवर शिकायला लागले. अभ्यासात रमले. शिकवण्या करत, कुठेतरी कामं करत घर चालवू लागले. अभ्यास करता करता ओळखीच्या मुलांमधे परत पक्षकार्यात भाग घ्यायला लागले. वहिनीला त्याचं फारसं सोयरसुतक नव्हतं. तो अभ्यासात रमलाय, संध्याकाळही उडाणटप्पूपणात घालवत नाही आहे याचं तिला समाधानच होतं. बापू प्रत्येक वर्षी पहिले येत होते. पाचसहा वर्ष भरभर संपली. आणि ते एमस्सी. झाले. घरातल्या लोकांचा आनंद मनात मावेना. वहिनीच्या नेत्रांमधून घळाघळा अश्रू वाहायला लागले जेव्हा बापूंनी त्यांच्या हातात आपलं गोल्ड मेडल ठेवलं तेव्हा. .. स्वर्ग फार जवळ आला होता वहिनीच्या..आता तो मोठ्या नोकरीत लागेल, आपले काटकसरीचे दिवस संपतील, घर सुनेच्या, नातवंडाच्या हालचालींनी भरून जाईल ही एवढीच तर स्वप्नं असतात कुठल्याही माऊलीची..''

दादा बोलायचे थांबले. चालायचे थांबले. कॉलेजच्या आवारातल्या एका बाकावर जरासे टेकले मग सगळेच एकमेकांसमोर बसले. बापूंची कथा थोडी खंडित झाली.. .. एक दिवस वहिनी आणि बापू जेवायला बसली होती. वहिनीनेच विषय काढला..

'' शेजारच्या फडक्यांची ललिता आली आहे.. '' बापू जेवतच राहिले. त्यांना आपल्या आईच्या मनाचा सुगावा लागलेला होता. आईला ललिता फार आवडते हे त्यांना कळलं होतं. आणि तिच्या इराद्याचाही अंदाज आला होता..

'' नेहमीच येते ती.. '' बापू सहज म्हणाले.

'' फडक्यांच्या ताई मागे लागल्या आहेत.. ललिताला सून करून घ्या म्हणून..''

'' पण आपल्याकडे तर लग्नाचं कुणीच नाही आहे..'' बापू म्हणाले.

'' तुझ्यासाठी विचारत होत्या त्या..'' रागावर संयम ठेवत वहिनी म्हणाली.

''.. त्यांना सांग, बापूला लग्नच करायचं नाही आहे..'' एक क्षण हातात घास तसाच धरून बापू थांबले. बापूंनीही सोक्षमोक्ष लावून टाकायच्या हेतूने म्हटलं.

‘‘ तू लग्न नाही करणार ?.. हे काय नवीन आणि का ?’’

‘‘ पक्षाचं कार्य करणार आहे.. तीन महिन्यांपूर्वी डॉक्टर वारले तेव्हाच ठरवलं होतं ..’’

वहिनीला हा धक्का अनपेक्षित होता. झाडावरून सगळी फुलं,पानं क्षणात वाळून, पिवळी पडून पायदळी उतरावीत तशी वहिनीची स्वप्नं एका क्षणात वठल्यासारखी झाली..चेहऱ्यावरून आश्चर्य आणि विरस भावांचा झाकोळ उमटून गेला.

‘‘ पक्षाचं काम लग्न करून करता येत नाही का ?’’ तिने रागाने विचारलं.

‘‘ पण मी पूर्ण वेळ पक्षकार्य करणार, मी कुठे राहणार सगळंच अनिश्चित.. कशाला संसारात पडायचं.. देश कार्याच्या आड आणायचं ?’’

‘‘ देशकार्याला संसार अडथळा ठरतो ?’’ वहिनी चांगलीच संतापली.

‘‘ ते मला माहीत नाही.. मी लहान कार्यकर्ता. पण मला संसाराचं ओझं नको आहे..’’

‘‘ मग राम-कृष्ण, शिवाजी, टिळक,या सर्वांनी संसार करतच कार्य केलं ना ? त्यांच्या आड नाही आलं ते संसाराचं ओझं.. का ते लहान कार्यकर्ते होते.. का त्यांनी लग्न नसती केली तर ते आणखीन मोठे झाले असते ?’’ वहिनी आपल्या मुलाला कळवळून समजावू लागली.

‘‘.. मी तेवढा थोर नाही.. माझा वाटा खारीचाच असणार आहे.. ’’

‘‘.. मग तुझ्या देशकार्यात मुलाने करायची कर्तव्य येतात की नाही ते तरी कळू दे मला..’’

‘‘.. मी पैसे पाठवत जाईन तुला, जिथे असेन तिथून.. हवंतर तू ताईकडे राहायला जा..सोबत हवी असली तर.’’

बापूंचे शब्द ऐकून, नागाने फणा काढून ताठ व्हावं तशी वहिनी अपमानाने फणकारली, चेहरा लाल झाला,

‘‘.. शहाणाच आहेस.. सुवर्णपदक काय मिळालं, सारं शहाणपण गवसलं असं वाटायला लागलंय तुला..म्हणे ताईकडे जा.. सारं आयुष्य मानाने स्वतंत्रपणे जगता यावं म्हणून तुझ्या मोठ्या होण्याकडे मन गुंतवून बसले..त्यापेक्षा तू जा आणि मी कुठेही जाईन. कुठल्या तरी देवळाच्या पायरीवर बसले तर दोन मुठी तांदूळ नक्कीच मिळतील मला पोट भरायला..पण मुलगा सांभाळत नाही म्हणून लोकांकडे राहते असं बिलकूल म्हणवून घेणार नाही..’’

वहिनी संतापाने गदगदायला लागली. तिच्या डोळ्यांमधून पाण्याच्या धारा लागल्या. २०व्या वर्षी पतीचा आधार तुटल्यावर अगतिकतेने तिला भावांच्या आश्रयाने राहावं लागतंच होतं. पण त्यातूनही आता सुटका झाली होती. आणि आता परत तो प्रसंग डोळ्यासमोर परत उभारला. ती कासावीस झाली.. मामाला काय बोलावं कळेना..हा आचवून दोघेही उठली. घरात जीवघेणी शांतता मारेगाळत राहिली.

दोघंही रात्री झोपली खरी पण डोळे उघडेच होते दोघांचे..

डोळ्यांवर हात आडवा धरून वहिनी एकटीच बोलायला लागली,

'' बापू, माझं ऐक.. एकटेपण फार वाईट असतं रे..फार असह्य.. जे माझ्या वाटेला आलं ते तुझ्या वाटेला येऊ नये असं वाटतंय..स्वतःला जपायचं.. शील जपायचं.. शब्द जपून वापरायचे.. शरीरातलं, मनातलं दाबलेलं वादळ डोळ्यांमधून सांडूनही चालत नाही, अशी सगळ्यावर समाजाची कावळ्यासारखी नजर.. मेलेल्या मनाने जगलं तरच आम्हा बायकांची जरातरी बरी अवस्था..म्हणून म्हणते..लग्न कर.. हवं तर सुनेला घेऊन मी इथे राहते..तू जमेल तसं येत जा.. पण जोडीदार शोध, म्हणजे दुःख पचवायलाही ताकद येते..आता तुला हे कळणार नाही..पण म्हातारपणी ही व्यथा जीव खाईल..मला निदान तुझं तरी भविष्य होतं बघायला..''

मामाने डोळ्यांवरचा हात काढलाच नाही. मग वहिनीने नवीन अस्त्र काढलं..म्हणाली,

'' तुझ्या बुध्दीचा तरी उपयोग करून घ्या म्हणावं तुझ्या त्या लोकांना..तरुणांना शिकवायचं काम तरी द्यायला सांग..तुझ्या त्या सुवर्णपदकाचा तरी मान राखा म्हणावं.''

'' सुवर्णपदक दरवर्षी कितीतरी मुलांना मिळतात..'' मामा एकच वाक्य थंडपणे म्हणाला आणि कूस बदलून झोपला...

बापू आपलं मत बदलणार नाही हे वहिनीला चांगलं माहीत होतं.

'' माझ्याच नशिबी एकटेपणाचं जिणं आहे..दिसतंय..आपलं माणूस सतत आपल्याजवळ राहायलाही भाग्य लागत असावं.. माझीच जवळची माणसं कशी दुरावतात?'' वहिनी एकटीच बोलत राहिली आणि उष्ण कढांनी उशी भिजवत राहिली..

बापूमामा सकाळी उठून तयारी करून बाहेर पडले..दोन दिवस कुणीच धड बोललं नाही, जेवलं नाही की, झोपलं नाही. चार दिवसांनी मामाने वहिनीला सांगितलं की पुण्याहून दूर मद्रासला त्याचं जाणं नक्की झालंय. हे सगळ्या वाड्याला कळलं. त्यादिवशीपासून घरातली कार्यकर्त्यांची वर्दळ वाढली. बापूंची ट्रंक भरून तयार होतीच. होतंच काय त्यात? दोन सदरे, दोन धोतरं, गणवेश, दोन चादरी..मामाने स्वतःला कधी चांगले कपडे घेतलेच नव्हते.

निघायचा दिवस उजाडला.. काही लाडू, चिवडा बरोबर देऊ का असं विचारल्यावर तो किती दिवस पुरणार असं मामांनी विचारलं आणि संभाषण संपलं. सामान भरतांना वहिनी समोरच बसली होती.

''.. आणि तुझं सुवर्णपदक कुठे दिसत नाही ते..? '' वहिनीनी विचारलं तर मामा गप्पच बसला. त्याला ऐकू आलं नसेल म्हणून वहिनीनं परत त्याला विचारलं.

'' माझ्याजवळ नाही ते.'' मामाचा आवाज खाली आला होता. आता पुढे बॉम्बस्फोट होणार हे त्याला माहीत होतं.

'' नाही म्हणजे.. मी नाही समजले..अरे सांग तरी.. आपल्या घराण्यात तू एकटाच आहेस तसं पदक मिळवणारा..''

‘‘ सुरक्षित आहे पण..’’

‘‘ कुठे ?’’

‘‘ सराफांकडे..’’

‘‘ गहाण टाकलंस ? का ? ’’ वहिनी थक्क झाली.

‘‘ .. गुरूदक्षिणा द्यायची होती.. जवळ पैसे नव्हते.. तेवढं एक पदकच माझ्या हक्काचं होतं .. म्हणून गहाण ठेवलं आणि व्यास जयंतीला डॉक्टरांना गुरुदक्षिणा दिली..’’ मामाला आईकडे पाहायची हिंमत झाली नाही.

थोड्या वेळाने वहिनी भानावर आली. डोळ्यात अश्रू अनावर होऊन बाहेर घरंगळले.. ‘‘ एवढा सोन्यासारखा माझा मुलगा ज्याने नेला, त्यापुढे पदक ते काय ? ’’ वहिनी पुटपुटत राहिली. वहिनीचा आवाज कोरडा झाला होता.

‘‘ तू असं का म्हणतेस ? घरात कार्य निघालं की सगळेजण कामं नाही का वाटून घेत ? आज आपल्या देशाचं गुलामीतून बाहेर पडायचं कार्य निघालं आहे, कित्येक मुलं काळ्या पाण्याची शिक्षा भोगतायंत..या मोठ्या घरातले सगळे तरुण कामाला लागलेत असं समज..’’ मामाने पहिल्यांदाच समजूत घालायचा प्रयत्न केला होता. मामाचं शांत, धीरोदात्त, शहाणपणाचं बोलणं ऐकून वहिनीच्या ह्रदयात उमाळा भरून आला.

‘‘ मी कुठे म्हणते आहे देशकार्य करू नका म्हणून ? ’’ मुलानं लग्न करावं हा सुध्दा स्वार्थीपणा आहे असं भासवणाऱ्या आपल्या मुलाला अगतिकतेनं तिनं विचारलं.

‘‘ अग ! मी तरी कुठे असा लांब जातोय. आपल्या देशाचे सैनिक नाहीत का जात सीमेवर लढायला तसंच समज. त्यांचे आईवडील एकटे राहात नाहीत का ?’’

‘‘ तुझ्या दूर राहण्याचं नाही रे मला वाईट वाटत ! पण तुझी बुध्दी पणाला लागणार नाही याचं वाईट वाटतंय.. तू लग्न करणार नाहीस म्हणतोस त्यामुळे खचल्यासारखं झालंय.. एवढं सैनिकाचं उदाहरण देतोस तर सैनिक म्हातारा झाला की देशाच्या सीमा उघड्या पडल्या तर चालणार आहेत का सांग मला ? तिथे त्याचा मुलगा नको का उभा राहायला ? माझ्यासारख्या अडाणी बाईला जे कळतंय ते तुम्हा शहाण्यांना कळत नाही आहे म्हणून दुःख होतंय.. तुम्ही म्हातारे होईपर्यंत देश स्वतंत्र होईल. मग तेव्हा देश चालवायचा कुणी ?’’

वहिनीपुढे बोलायची सोयच नव्हती. थोड्याच वेळात टांगा आला..बापूंचे स्नेही, मित्र, सगळे दारात उभे होते.

बापूंचा टांगा दिसेनासा होईपर्यंत सगळे दारात उभे होते. मग सगळे पांगले. वहिनी आत आली. वहिनीला एकटं वाटायला नको म्हणून ताई मुलांना घेऊन चार दिवस राहायला आली होती, तीही पंधरा दिवसांनी परत गेली. दिवस सरले तशी वहिनीला एकटं राहायची सवय झाली..’’ यमुना बोलायची थांबली.

‘‘ बापूंनी सबंध आयुष्यभर समाजसेवाच केली. मी त्यांचा सहाय्यक पण एका तपस्व्याबरोबर राहतोय असंच मला वाटायचं.. साधूसंतांनाही जन्म घ्यायला एक कूस हवी ना म्हणून त्यांना आईचं एक नातं स्वीकारावं लागायचं.. ’’

‘‘ पण असे कार्यकर्ते प्रत्येक पक्षाकडे होते. त्यावेळी निष्ठावंतांचा असा वेगळा गट नसायचा पक्षात ..पक्षश्रेष्ठी सांगतील ते काम तळमळीने करायचं एवढंच प्रत्येकाला माहीत होतं.. मग तो संघ असो, वा कम्युनिस्ट असो वा समाजवादी...आपलं सुवर्णपदक गुरुदक्षिणेसाठी गहाण टाकणारं तर आता कुणीच नाही.’’ अनंता म्हणाला.

‘‘ बापूमामाने आयुष्यभर एकच व्रत घेतलं. तळागाळातल्या लोकांची सेवा. पक्षसेवा. कुठेही त्याचं नाव नाही, दखलही नाही. दरवर्षी एकदा आईला भेटायला यायचं. महिनाभर राहायचं नातेवाईकांना भेटायचं परत जायचं. वहिनी खूप वर्षं जगली. वर्षातला एक महिना तिला दिवाळीसारखा वाटायचा. आम्ही नातवंड आलो तरी तिचं मन मामातच गुंतलेलं होतं.मठ, देवळं, पोथ्या, शेजारणी यांच्यात वेळ घालवत राहिली. विसाव्या वर्षापासून पतीसुख संपलं. अपत्य योग हा असा ....तिच्या भावनिक, शारीरिक भुकेच्या संयमनाचं असिधारा व्रत तिनं कसं सोसलं माहीत नाही..आज मोठं झाल्यावर माझ्या हे सगळं लक्षात येतंय...अशा कितीतरी अभागिनी त्या काळी समाजात होत्या...’’ यमुना बोलतच राहिली..स्वतःशीच..

वहिनी वारली. बापूंमामाला तार करून बोलवून घ्यावं लागलं. तेव्हाची गोष्ट.. मी मामाला विचारलं की वहिनी गेल्याचं कळल्यावर तुला काय वाटलं रे? तर काय म्हणाला माहीत आहे? म्हणाला, खरं सांगू? दरवेळी सुटी संपवून परत जातांना मला खूप जड जायचं. टांगा दारात येईपर्यंत तिचा उत्साह सांडत असायचा. आणि मी अस्वस्थ असायचो. टांगा सुरू झाला की माझं तोंड दाराकडे व्हायचं आणि ती लांबवर दिसत राहायची. पण माझ्या टांग्याच्या मागे मागे तिचे डोळे धावतायंत असं वाटायचं. टांगा पुढे सरकला की डोळ्यातून पाणी येऊ द्यायचो.. आता मात्र ते पाठलाग करणारे डोळे असणार नाहीत.. मामाचा स्वर ओथंबला होता. ..’’ दादा म्हणाला.

‘‘ नंतर म्हणाला, एक मात्र आता खटकतंय.. आम्हा तळमळीने कार्य करणाऱ्यांकडे पैसा साठला नाही.. आमचं म्हातारपण येईल तेव्हा आमच्यासाठी वृध्दाश्रम असणार नाहीत. .. अजून काही वर्षांनी पक्ष आमची काळजी कशी घेईल याची मात्र शाश्वती नाही..’’

‘‘ पण ती वेळ आलीं नाही..विकलांग झाला नाही मामा.. आज ते सुवर्णपदक परत त्याच्या पायापाशी पाहिलं आणि मला रडू आलं.. ते आलं तरी कुठून?’’ यमुना म्हणाली.

‘‘ हो! असे सत्शील लोक अजून आहेत आपल्या समाजात म्हणून तर देश चाललाय.. ज्या सराफांकडे मामाने आपलं सुवर्णपदक गहाण ठेवलं त्यांनी मामाला कारण विचारलं आणि गुरुदक्षिणेसाठी ते आपल्याकडे आलं आहे हे ऐकू ते थक्कच झाले. ते पदक त्यांनी तसंच ठेवलं.. मरतांना आपल्या मुलालाही त्यांनी सांगून ठेवलं की जेव्हा बापू गावात येतील तेव्हा ते त्यांना परत दे.. त्यांचे पैसे फेडले गेलेले नाहीत पण देशासाठी आपला जीव तारण ठेवणाऱ्या या मुलाकडून कसे घ्यायचे पैसे? बापू मद्रासला निघून गेल्यामुळे, वहिनीने घर बदलल्यामुळे त्यांच्याकडेच राहिलं ते पदक..पेपरमधे बापूंच्या निधनाची बातमी वाचून त्या मुलाला पदकाची आठवण झाली आणि त्याने ते पक्ष कार्यालयाकडे परत केलं..’’

‘‘.. तुम्हाला माहीत नसेल तर सांगतो, त्या मुलाला मोठा अपघात झाला तेव्हा रक्तदान करून त्या मुलाचा जीव बापूमामांनी वाचवला होता, ते ऋण तो सराफ कधीही विसरला नाही.. आणि बापूंनाही पैसे फेडायचे राहिल्याची चुटपुट कधीही लागली नाही..बापूंना पदकाचं अप्रूप नव्हतंच..त्यांनीच मला ही आठवण सांगितली होती..’’ राममूर्तींनी आणखी एक धक्का दिला..

सगळे मूकपणे बसून राहिले.

‘‘ यमुना, तुला ती गोष्ट आठवते का ? दधीची ऋषींची ? देव-दानवांच्या युध्दात देवांचा पराभव व्हायला लागला तेव्हा या ऋषींनी आपल्या अस्थि शस्त्र बनवण्यासाठी दिल्या. त्या अस्थींपासून अमोघ शस्त्र बनलं आणि त्याने देवांचा जय झाला. ..आता मामाचा देह अभ्यासासाठी वापरला जाईल..पुढच्या पिढीच्या भल्यासाठी त्याचा उपयोग होईल.. ..पण त्याच्या अस्थिंची रक्षा होणार नाही..असे हे दधिची होते म्हणून देश वाचला.. पण सत्तासुंदरीच्या लोभाने आता सारेच विश्वामित्र कसे घसरणीला लागलेत ते पाहिलं की परत असे दधीची होतील का ? हा प्रश्न मनाला जखमी करून जातो..’’

दादा म्हणाला.

खूप वेळ सगळे निःशब्द राहिले आणि दादा उठून चालू लागला तेव्हा त्याच्या मागे निमूटपणे चालायला लागले..

# उल्का

इवल्याश्या नेत्रगोलांमधे अथांग सागर मावू शकतो. त्याच्या असंख्य लाटा, क्षितीजाची लांबलचक रेघ,निळ्या आकाशाचा घुमट.. .. .. नखभर बीजामधे लपलेला असतो अनेकबाहू वटवृक्ष. माझ्या समोरच्या पिशवीत दडली आहे रुपच्या दणकट देहाची करपून काळी झालेली मूठभर **रक्षा** आणि थोड्या अस्थी.

काल सकाळी तिच्या जळलेल्या देहाला मृत म्हणून घोषित करायला मीच आले होते. तेव्हा मी तिची डॉक्टर होते, आज आले आहे ती तिच्या मुलांना भेटायला. तिचे आईवडील, मुलं सगळी माझीच पेशंट आहेत. काल सकाळी- नव्हे पहाटेच, रुपच्या सैपाकघरातून आगीची धग आणि धूर यायला लागला. गाढ झोपेत असलेल्या सर्वांना तो जाणवला आणि सगळी खडबडून जागी झाली. सैपाकघराच्या बंद दाराकडे पाहून किंचाळायला लागली. शेजारीपाजारीही त्या किंचाळण्याने जागे झाले आणि रुपच्या दारात उभे राहिले. सगळा जोर एकवटून रुपचा मुलगा दार उघडण्याचा प्रयत्न करत होता. भेदरलेला होता. बाकीजण घाबरून रडत होते, पाणी मारत होते. बंद दारामागे आहे तरी कोण? अम्माने पाहिलं.. .. रुप? खरंच..रूपच.. विचित्र कोलाहल माजला. शेजारीही मदतीला धावले आणि अखेर दरवाजा मोडला आणि उघडला.

सगळ्यात आधी पळाला तो कधीपासून आत कोंडलेला धूर..नाकाडोळ्यातला धूर काढून टाकायचा प्रयत्न करत ज्यांना धाडस होतं ते आत डोकावले. आणि सुन्न झाले. लाकडी खुर्चीत बसलेली रुप ज्वाळांनी लपेटलेली होती. तिच्या आजूबाजूच्याही काही वस्तू पेटल्या होत्या. भयानक होतं ते दृष्य. जळलेली कातडी, घाणेरडा कुबस वास, जळके कपडे. रूपचं ते भीषण रूप ज्यांना बघवलं नाही, ते लटपटले आणि बाहेर पडले. क्षणात वस्ती गोळा झाली. बाहेर येणाऱ्या प्रत्येकाला दबक्या आवाजात लोक विचारत होते, ‘ काय झालं ? ’ तोही पुटपुटत होता, ‘‘ बघवत नाही आहे. ’’ असं काही घडलं तर पुढे काय होतं हे कधीच न अनुभवलेले लोक पुढे काय काय होतं ते पाहायला तिथेच रेंगाळत राहिले आणि बाकीचे भानावर येत कामाला जाण्यासाठी निघून गेले. पण सगळे सुन्न झाले होते.

मन सुन्न असलं की काही नको वाटतं. तसंच झालं. घराघरातले रेडियो बंद झाले. घोळक्यातल्या लोकांनी दबलेल्या आवाजात रुपच्या आत्महत्येच्या कारणांचा अंदाज बांधायला सुरुवात केली. एवढ्यात पोलिस आले. ॲम्ब्युलन्स आली. रुपच्या घरात शिरून त्यांनी चौकशी सुरू केली आणि तिचा देह ते घेऊन गेले. त्याआधी घाबरलेले लोक मला बोलवायला आले तेव्हा मी भराभर माझं आवरून रूपच्या घरी गेले. पोलिसांनी माझीही चौकशी केली... नंतर काय झालं मला माहीत नाही. मी आज परत सगळं निवळल्यावर त्यांना भेटायला आले..

आज त्याच्या घरातले आक्रोश थंड पडले होते. अम्मा तेवढी रडत होती. बडबडत होती. तडफडत होती. बलवंतकडे जळजळीत कटाक्ष टाकत होती. खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यात विस्कटलेल्या केसांची चांदनी पाय जवळ घेऊन डोक्याला हात लावून कोरड्या डोळ्यांनी, भकास मनाने सगळं ऐकत बसली होती. बलवंत मात्र बेडरपणे जे काही चाललं होतं त्याचं विधीनिषेध नसल्यासारखा मुर्दाड चेहऱ्याने घरात हिंडत होता. हा रुपचा नवरा आहे हे त्याच्या वागण्यावरून

कुणालाही कळलं नसतं. याच्या बायकोने काल स्वतःला जाळून घेतलंय हे त्याला कळलंय की नाही असंच वाटावं असं त्याचं वागणं होतं. त्याचं बलदंड शरीर, भेदक डोळे, उंचपुरं शरीरच त्याच्या बेमुर्वतपणाची साक्ष देत होतं.

म्हणूनच तर बलवंत कोण आहे, त्याचा काय इतिहास आहे, त्याचं कुटुंब काय आहे हे कळायला लोकांना खूप उशीर झाला. निर्वासितांच्या त्या बैठ्या घरांमधे साधीच माणसं राहात होती. घरदार सोडून पोटापाण्यासाठी मुंबई गाठलेल्या या लोकांच्यात मेहनतीने पैसा मिळवावा, सभ्यपणे पापभिरु आयुष्य जगावं एवढीच त्यांची हिंमत होती. बलवंतने तिथलंच एक रिकामं घर भाड्याने घेतलं आणि तो कधीमधी तिथे रात्रीच्या मुक्कामाला यायला लागला. बरेचसे मित्रही असायचे त्याच्याबरोबर. तो सकाळी निघून गेल्यावर त्याच्या घराची साफसफाई करणाऱ्या गड्याकडून एकेक गोष्टी लोकांना कळायला लागल्या. किती सिगरेटी संपल्या होत्यापासून, कायकाय जेवला, कोण कोण होतं इथपर्यंत! गड्याकडून चौकस बायकांपर्यंत आणि बायकांपासून त्यांच्या नवऱ्यांपर्यंत प्रवास पूर्ण झाल्यावर मात्र लोक त्याच्यापासून दूर राहायला लागले. समोर आलाच तर तोंडदेखलं हसायला लागले. किंवा शक्य तोवर टाळायलाच लागले.

बलवंत पंजाबमधल्या एका श्रीमंत कापड व्यापाऱ्याचा मुलगा. खूप लाडावलेला पण त्याचा व्हायचा तो दुष्परिणाम झालाच. बलवंत चांगलाच बिघडला. बापाने समजावून सांगितलं. पण मुलगा हाताबाहेर गेलाय याची खात्री झाल्यावर सरळ त्याला घराबाहेर हाकललं. गावातल्या मुलींच्या घरातून तक्रारी यायला लागल्या, दारूचं व्यसन तर सरळसरळ वाढतंच चाललं होतं, त्यामुळे भुकेचे चटके दिल्याशिवाय हा वळणावर यायचा नाही याची बापाला जाणीव झाली. बाप व्यापारी होता. गुंतवलेला पैसा चौपट केला नाही तर व्यवसाय बुडला समजायचं असं त्याचं मत होतं. त्यामुळे मुलगा ही सुध्दा त्याची एक गुंतवणूच होती. त्यात घाटा म्हणजे मुलालाही बाहेर काढणं हा एवढाच पर्याय त्याच्यासमोर राहिला.

बलवंत बाहेर पडला. शंभर रुपये बापाने दिले ते काटकसरीने वापरत, कधी फुटकळ नोकऱ्या करत, कधी दुकानाच्या पायरीवर झोपत, गाव बदलत दिल्लीला पोचला. गावात भटकत असतांना त्याला एका ठिकाणी शूटिंग चालू असलेलं दिसलं. ते बघण्यात त्याचा बराच वेळ गेला. शूटिंग संपल्यावर त्यांची आवरा आवर सुरू झाली. सामान ट्रकमधे भरायला लागलं तेव्हा त्या मुलांबरोबर त्यांना तो मदतीच्या बहाण्याने बोलायला लागला. त्यांना मदत करायला लागला. दुसरे दिवशीचं लोकेशन विचारून तिथे पोचला. मग रोजच त्याने तिथे हजर रहायला सुरवात केली. शूटिगं बघायला लोकांची गर्दी तर असतेच, पण त्यात बलवंत उठून दिसत होता. त्याची उंची, चेहऱ्यावर श्रीमंती, मगरूरीची खानदानी पंजाबी कळा सिनेमाच्या निर्मात्यांच्या लक्षात यायला लागली. दिग्दर्शकाच्या पुढे पुढे करणारे ते लोक पाहून त्याला चित्रसृष्टीत शिरण्याचा मंत्र मिळाला. मग तो त्या क्षेत्रात कायम झाला. दिग्दर्शकाबरोबर गोंडा घोळत फिरणं, त्याची लहानमोठी कामं करणं यात त्याचा वेळही जायला लागला आणि जेवणाखाण्याची सोयही झाली. ड्रायव्हरची नोकरी मिळाली, मग हळूहळू त्याने कॅमेरात लक्ष घालायला सुरुवात केली. पडेल ते काम करण्याच्या स्वभावामुळे प्रत्येक गोष्ट त्याला कळायला लागली. निर्मात्याबरोबर दारू पिण्याची सोयही झाली. पण त्याचा हिशेब पगार मिळतांना झाला. पैसे कापले गेले होते. सडाफटिंग असल्याने तेही चाललं. लोकांनी टाकलेल्या सिगरेटच्या थोटुकावर त्याची सुरूवातीला तरी सिगरेटची तल्लफ भागली.

त्यातच त्याला रुप दिसली. मॉब सीन मधे काम करत होती. कधी नाच करायची कधी पाणी भरायच्या सीन मधे असायची. काहीही रुप नसलेली रुप. फक्त उफाड्याचं शरीर, आणि सुंदर नाक, एवढीच जमेची बाजू. बाकी चेहऱ्यावर उर्मट कळा, बारीक डोळे, भांडकुदळ स्वभाव यामुळे इतर मुलींपासूनही ती दूरच असायची. इथे आल्यावर बलवंतची

मुली आणि दारू यांची चांगली सोय झाली. रुपही इथे कामाला आली ती पैसे मिळवायलाच. अभिनय आणि कलेशी तिचा काहीही संबंध नव्हता. एरवी शरीरसुख देणं आणि पैसे मोजून घेणं हाच तिचा धंदा होता.

अनीती हीच नीती असलेल्या रुपच्या वस्तीत भांडणं मारामाऱ्या झाल्या नाहीत अशी रात्र जळायचीच नाही. कुणीकुणाला फसवलं की रुपचं माथं ठणकायचं आणि त्या पुरूषाशी दोन हात करायला ती पुढे असायची त्यामुळे बाकीच्या मुलींना तिचाच आधार वाटायचा. खरं तर सुरूवातीला संसार करून रहावं असं रुपला फार वाटे. तिच्याकडे येणाऱ्या पुरूषाकडे तो लग्न करून घेऊन जाईल याच आशेने ती पाही. पण कुणीच तिला नेलं नाही. मग तिने आपला स्वप्नाळू स्वभाव गाडून टाकला. आयुष्याशी झगडत जगणं हेच तिला शिकायला मिळत होतं.

एकदा एका माणसानं तर कहरच केला. जातांना तिच्या हातावर पैसे ठेवलेन, ते तिने ब्लाऊजमधे ठेवलेन. परत निघतांना त्या मुद्दाम तिला परत जवळ घेतलंन् आणि थोड्याच वेळात तिला कळलं की आपले ब्लाऊजमधले पैसे गायब आहेत. त्यादिवशी तिने त्याला घातलेल्या शिव्यांनी तिची आई अम्माही दचकली आणि म्हणाली, ‘ बस् कर रुप तुझं तोंड. आपल्यासारखाच कुणी शापित जीव असेल. जेवणासाठीही पैसे नसतील तर ही भूक भागवण्यासाठीही पैसे नसतील. शांत हो आता. आपल्याला दिसतं ते कायम भुकेजलेलं जग. माणसातलं वाईट आपल्याला जेवढं कळतं एवढं कुणालाच कळत नाही.’

अशाच एका महाभागानं तिच्या पदरात एक मुलगी घातली.

चांदनी. कुरळ्या केसांची गोड चांदनी. चांदनीचा बाप रुपला न्यायला येणार होता. पण कधीच आला नाही.

रुपला सिनेमात काम करायला मिळालं तो पहिला दिवसही तिच्या आयुष्यातला न विसरण्यासारखा दिवस होता. झुळझुळीत कपड्यांनी तिचं शरीर मोहरलं. मेकपमुळे आपण फार सुंदर नाही आहोत याचंही भान आलं. पण असे सुंदर कपडे घालायला मिळणं, फुकट चहापाणी मिळणं, हेच तिला अप्रूप होतं. रुपला कामं मिळायला लागली, पैसे हातात खुळखुळायला लागले, रोजच ती मेकप करायला लागली. चांगलं नटायला लागली. आणि त्यातच बलवंत भेटला. तिच्याबरोबर राहायला तयार असलेला. रुप हरखून गेली.

बलवंत तिच्या घरी यायला लागला. सात आठ वर्षाच्या चांदनीसाठी चॉकलेटं आणायला लागला. बलवंत आपल्या पाशात अडकतोय हे पाहिल्यावर रुपने त्याच्यामागे दुसऱ्या वस्तीत राहायला जायची भुणभुण लावली. एक दिवस बलवंत आला आणि घाईघाईने रुप, चांदनी, अम्मा आणि बाबाला घेऊन या घरात ठेऊन निघून गेला. दुसरे दिवशी रुपला पाहून वस्ती हादरली. पण बोलायची सोय नव्हती. पण रूप शहाणी होती. तिने या लोकांपासून स्वतःला दूर ठेवलं. बलवंत घर चालवायला लागला. पैसे जास्त मिळाले की बलवंतचं दारू पिणं जास्त.

बलवंतने तिच्याशी लग्न केलं नाही पण आयुष्यात स्थिरावली. दिवस उलटायला लागले. रुपला दोन मुलं झाली. रुप मुलं आणि बलवंतच्या प्रेमाच्या संसारात रमली.

ही सगळी माणसं मग माझी पेशंट झाली. मुलाबाळांच्या दुखण्यात रूप त्यांना घेऊन माझ्याकडे यायला लागली. कधी तिचे आईवडील अम्मा आणि बाबा येत आणि कधी चांदनी एकटी. इतर पेशंटस्कडून रुपची माहिती मला आधी कळलीच होती. मग रुप प्रत्यक्ष भेटली. रुपच्या मुलांना सर्दीपडशापेक्षा मारामारीच्या जखमाच अधिक होतं. चांदनी मात्र

क्वचित आजारपणामुळे येई. तिच्या गालावरच्या दोन खळ्यांमधून गोड हसे आणि औषध घेऊन जाई. रुपच्या मुलांची नावंही दिव्यच होती. जेव्हा बलवंतला थंडर नावाच्या घोड्यावर बक्षिस मिळालं तेव्हा त्याला झालेल्या मुलीचं नाव त्यानं ठेवलं बिजली. दुसरा मुलगा झाल्यावर आठ दिवसात त्याला एका प्रोड्युसरकडे काम मिळालं त्या प्रोड्युसरचं कुंदन नाव त्याने आपल्या मुलाला ठेवलं. त्यानंतरचा मुलगा मात्र लोळागोळा निघाला कारण रुपच्या आठव्या महिन्यात बलवंतने तिच्या पोटावर काठी मारली, इतका तो त्यादिवशी दारू पिऊन आला होता. आणि त्यावरून दोघांचं कडाक्याचं भांडण झालं होतं. त्यानंतर लालु जन्मला तो अपंगच, जवळजवळ लोळागोळा झालेला. दुःख पचवलेल्या रूपनं तेही दुःख पचवलं. मनात हिरवळ अंकुरलीच होती कुठे ?

एक दिवस रुपच्या आधी मी एका बाईला तपासत होते. मनस्तापानं तिचं ब्लडप्रेशर खूप वाढलं होतं म्हणून मी तिला मनस्ताप कमी करायला सांगितलं. ती बाई गेल्यावर रुपनं मला तिच्या मनस्तापाचं कारण विचारलं. तिच्या मुलीनं नात्यातल्याच मुलाशी लग्न ठरवलं होतं हे कारण कळल्यावर रुप थंडपणे म्हणाली,

‘‘ त्रास करून घेऊन काय होणार दीदी! बाई आणि पुरूषात नातं एकच आणि ते म्हणजे शरीर सुख.. कसली नाती आणि कसली गोती दीदी..’’

‘‘ तुला नाही कळायचं नात्यांचं पावित्र्य रुप!’’

‘‘ दीदी, एक दिवस सगळी नाती मोडून पाहाण्याचा दिवस ठेवा आणि पहा, किती नाती मोडतात ते! सख्ख्या बहिण भावाचं नातं मोडलेलं नाही तुम्हाला दिसलं तर सांगा मला.. दचकूही नका तेव्हा, माझी आठवण काढा..समाजाला ही बंधनं आहेत म्हणून बाईला जरातरी सुख आहे. ’’ रुपच्या आवाजात थंड चीड होती.

‘‘ रुप,सगळी माणसं नाही मोडणार.. चांगली माणसंही असतातच ना ?’’

‘‘ चांगल्या माणसातही प्रकार असतात दीदी.. काही खरे सज्जन आणि काही बेगडी सज्जन..’’

‘‘ मी नाही समजले..’’

‘‘ दीदी, या गटारातल्या आयुष्याला कंटाळून एकदा मी एका स्वामीजींकडे गेले. मनाला शांती मिळावी म्हणून.. साधू मोठे नावाजलेले होते.. माझा धंदा ऐकल्यावर त्यांनी माझ्याकडे पाहायचंही टाळलं. त्या दिवशी त्यांचा मला राग आला नाही पण दुसरे दिवशी एका मोठ्या नावाजलेल्या बाईबरोबरचा पेपरमधे त्यांचा फोटो पाहिला आणि माझं माथंच ठणकलं. दीदी तिचा माझा व्यवसाय एकच होता.. पण तिची नाईट मोठी होती, नटी म्हणून तिचं नाव मोठं होतं..त्या साधूला ती चालली, मी नाही चालले..दीदी दलदलीमधे पाणी असतं, माती असते, पण हिरवळ नाही ना फुलत, तसंच आहे आमचं..घरात पुरूष आहेत, मुलं आहेत, पण संसारी नाही म्हणत आम्हाला कुणी....मी रखेलच राहणार..पण कुणी खोटेपणा केला की माझं रक्त तापतं आणि आगआग होते अंगाची..ती माणसं जास्त किळसवाणी वाटतात मला..’’

काय बोलणार मी तिच्या या अनुभवावर. ती नंतर बोलतच राहिली आणि त्या साधूला कडाकडा शिव्या घालत निघून गेली..रुप येऊन गेली की असं काही तरी भकास सत्य बोलून जायची की माझं लक्षच उडायचं कामातलं..

एक दिवस वाण्याबरोबर इतकी कचाकचा भांडली की सगळ्यांनी घरी जाऊन आपले कान धुतले. मी तिला कारण विचारलं तर म्हणाली की, लहान मुलं गेली की तो मुलांना फसवतो. वजनात खूप मारतो.. त्याला चांगला बदडायलाच हवा होता..'' त्याचा फायदा एकच झाला की तो वाणी सगळ्यांनाच प्रामाणिकपणानं वस्तू द्यायला लागला.

'' रुप, बरेच दिवसात लालुला नाही आणलंस ते ? '' एक दिवस मी तिला विचारलं.

'' त्याची तब्येत चांगली आहे मग कशाला आणायचं ?''

'' नाही दीदी, तो ना हरवलाय..'' बिजली म्हणाली.

''हरवला म्हणजे ?'' रुप काही बोलली नाही.. बिजलीचा हात धरून तिला दरादरा ओढत निघून गेली. पंधरा दिवसांनी अम्मा ब्लडप्रेशर तपासायला आली तेव्हा मी त्यांना लालुबद्दल विचारलं.

'' काय सांगायचं दीदी.. हल्ली बलवंत पार बेफाम वागायला लागलाय. दारू तर पितोच, पण जुगारही खेळायला लागलाय..पंधरा दिवसांपूर्वी मध्यरात्री बलवंत दारू पिऊन आला, वाटेतल्या लालुला त्याचा पाय लागला.. मग तो लालुवर चिडला.. त्याने त्याला लाथ मारली. ते पाहून रुप भडकली.. लालुच्या बाबतीत ती फार हळवी आहे..त्याला म्हणाली, तुझ्यामुळेच लालू असा झालाय, तूच कर त्याचं सगळं आणि घे प्रायश्चित्त.. मग बलवंतही चिडला. लालुच्या जन्माच्या आधी त्याला एका मोठ्या बॅनरचं काम मिळणार होतं ते निसटलं म्हणून लालुवर त्याचा राग होता. बलवंतने ते साफ नामंजूर केलं. उलट तिला म्हणाला की घरात हा गोळा ठेवण्यापेक्षा रस्त्यावर नेऊन ठेव त्याला.. हे माकड जगलं काय आणि मेलं काय, दोन्ही मला सारखंच आहे.. मग रुप खूप रडली..त्या दिवशी जेवलीही नाही. दुसरे दिवशी सकाळी पाहिलं तर लालु घरात नव्हता.. मी रुपला विचारलं तर रस्त्यावर ठेऊन आले एवढंच म्हणाली. .''

नंतर रूप जेव्हा भेटली तेव्हा मी तिला लालुबद्दल विचारलं तर गुरगुरली.

'' माणसं आहात की पशू ग ? लालुला कुठे ठेवलं ? रस्त्यावर ? आई आहेस की कोण ?''

'' आईच आहे मी दीदी, म्हणूनच रस्त्यावर ठेऊन आले.. त्याचा घरात जर एवढा अपमान होतो तर रस्ता काय वाईट आहे ? माणुसकी म्हणजे काय ते मी नाही जाणत ! शत्रूला मारलं की वीरचक्र द्यायचं आणि दुष्ट माणसाला मारलं की खून म्हणायचं ? लालु कणाहीन जन्मला पण त्याला तुम्ही डॉक्टर लोकांनी तेव्हाच मरू दिलं असतंत ना तर त्याचे हे भोग संपले तरी असते. पण तुम्ही लोकांनीच दुष्टपणाने त्याला जगवलं आणि भोग भोगायला लावलेत..तुम्ही लोकांनी दयेचं नाटक करून स्तःची ऑपरेशन नावाखाली चांदी करून घेतलीत.. आम्ही तर अडाणी आहोतच..पण तो साधं आयुष्य जगू शकणार नाही हे तुम्हा लोकांना चांगलं माहीत होतं.. तरीही त्याला जगवलंत आणि मला पशू म्हणता ? ''रुपच्या डोळ्यातून जे भाव निघत होतेते पाहून अंगार कशाला म्हणतात ते मी पाहिलं.

'' डॉक्टरांचा धर्मच असतो तो रुप..रोग्याला जिवदान देणंही शपथ असते आमची ! ''

'' हो ! पण त्याला काही तारतम्य हवं की नाही ? लालु सुटला असता तर मी तुम्हाला दुवाच दिला असता.. आणि आता राग करते तुमच्या धंद्याचा..म्हणून माझा त्रास मीच सोडवला.''

रुपचं बोलणं निखाऱ्यासारखं खरं आणि जळजळीत होतं. रुपने आपला राग आवरला आणि थोड्या वेळानं म्हणाली,''दीदी, आई आहे मी त्याची.. त्याला रस्त्यावर ठेवलं हे सगळं लोकांना सांगायला.. मी त्याला पोलीस स्टेशनच्या दारात ठेऊन आले. म्हणजे पोलीस त्याची कुठल्या तरी संस्थेत सोय करतील. निदान चांगलं औषध मिळेल त्याला..जेवण मिळेल..जगला तरी ठीक नाहीतरी ठीक..'' रुपच्या डोळ्यांमधून उष्ण पाणी वाहात होतं. माझेही डोळे पाणावले.

ती निघून गेली. परत मी विचारात पडले. दया म्हणजे काय? माणसाला भोग भोगू देणं की अशक्य असेल तर जीव जाऊ देणं? रुपचा विचार वास्तवाच्या कसोटीवर घासलेला होता आणि आम्हा व्यावसायिकांचा विचार 'परदुःख शीतल' च्या पायावर रचलेला होता. रुपचा धंदा कुणाच्या फसवणुकीवरती चालत नव्हता. शिक्षणामुळे आलेल्या वैचारिक गोंधळामुळे आम्ही जास्तच भोंगळ झालो आहोत असं वाटलं मला.

रुप माझ्या क्लिनिकमधे आलेली दिसली की मी तिला शेवटीच तपासायला घ्यायची कारण बोलणीच खूप व्हायची आमची. लालुला पोलिसांनी कुठल्यातरी अनाथालयात ठेवलेलं तिनं शोधून काढलं आणि तिचा जीव स्वस्थ झाला. नंतर ती एक दिवस माझ्याकडे आली ती बिजलीला घेऊन. खूप सर्दी झाली होती, म्हणून तिला मुलांबरोबर पाठवलं नाही म्हणाली. मुलांना घेऊन बलवंत फिरायला गेला होता.

'' रुप, चांदनीचं काय करायचं ठरवलंय तू? पंधरा-सोळा वर्षाची झाली आहे ती आता!'' मीच विषय काढला.

'' किती खुबसुरत दिसते ना चांदनी?'' रुप खूष झाली. माझीच नजर लागेल की काय असं वाटतं मला कधीकधी. बलवंत म्हणतो, की आपण तिला हिरॉईन करू. ॲक्टींगच्या शाळेत पाठवू. आता खूप निघाल्या आहेत म्हणे अशा शाळा. आता मान पण खूप मिळतो या व्यवसायातल्या लोकांना.. कॅमेरात खूप छान दिसते चंदनी.. तोच मला सांगत होता.''

'' चांदनीला घेऊन कधी गेला होता स्टुडियोत? '' मी सहज विचारलं आणि रुप विचारात पडली. कुणास ठाऊक..त्याला कसं कळलं ते. ..तो बोलतो कुठे हल्ली घरात? ढिम्म बसून असतो..'' त्याच विचारात ती निघून गेली. त्यालाही आता दोन-तीन महिने लोटले होते.

चार दिवसांपूर्वी ती चांदनीला घेऊन आली. बाकीचे पेशंट गेल्यावर मी चांदनीला आत घेतलं. चांदनी फिकट दिसतेय, जेवत नाही आहे म्हणाली. रुप बाहेरच बसली. चांदनीशी अभ्यासाच्या गप्पा मारता मारता मी चांदनीला तपासायला लागले. भूक लागत नाही म्हणून पोट तपासायला लागले आणि भोवऱ्यात अडकावं तशी चक्रावले.. .. परत परत पोट तपासायला लागले. .. चेहरा कसाबसा शांत ठेऊन मी चांदनीला बाहेर बसायला सांगितलं आणि रुपला आत बोलावलं.

'' काय झालंय चांदनीला? "

'' इथे बस आणि मी काय सांगते ते नीट ऐक..चांदनीला दिवस गेलेत रुप!""

'' पण तिची तर पाळी नीट चालू आहे..""

'' खोटं आहे ते रुप..नाटक करतेय ती..""

क्षणात रुपचा चेहरा इतका कठोर आणि हिंस्त्र झाला की मीसुध्दा घाबरले. तिने चांदनीकडे ज्या क्रूर नजरेने बघितलं त्याला माझ्याकडे शब्द नाहीत.. चांदनीला थप्पड मारायला तिने हात वर उचलला आणि पक्षाघात व्हावा तसा तो निखळल्यासारखा खाली आला. तिचा आवाज बंद पडला. चांदनीची अवस्था तर बळी गेलेल्या तडफडणाऱ्या बोकडासारखी झाली. रुपच्या चेहऱ्यावर घाम जमा झाला होता. आतल्या आत रुप फुटत होती..

'' तिला धंद्याला तर नाही लावलंस ?"" मी कोमलपणे रुपला विचारलं. तिने मान हलवून नाही म्हटलं.

मला काहीच कळेना. एक हिरवागार केळीचा कोवळा कोंभ आणि वादळानं फाटून फाटून गेलेली केळ.. दोघीही वादळात सापडल्या होत्या. मी चांदनीला ठेऊन घेतलं आणि रुपला घरी पाठवून दिलं. रुपलाही ते हवंच होतं.

'' कोण आहे तो रुप ?..सांग तरी मला.. ' मी तिच्या पाठीवरून हात फिरवत विचारलं. माझ्या स्पर्शाबरोबर चांदनी ढसा ढसा बांध फुटल्यासारखी रडायला लागली.

'' कुणी ओळखीतलाच आहे ?"" चांदनीने मानेनेच हो म्हटलं.

'' शाळेतला की शेजारचा की लांब राहाणारा कुणी ?""

त्यांच्यापैकी कुणीच नव्हतं. माझा मलाच प्रश्न पडला, घरातला असावा ? कोण ? कोण ? आणि माझ्या अंदाजाने मीच हादरले.. माझ्याच हातापायातली शक्ती वाहून गेली.. माझाच घसा कोरडा पडला..

'' घरातला ? वयानं मोठा ? ' मी घाबरून विचारलं. चांदनी काहीच बोलली नाही.. तिच्याकडून नकार यावा म्हणून मी देवाची प्रार्थना करत होते..

चांदनी माझ्या गळ्यात पडून खूप रडली.. .. खूप रडली.

'' बलवंत ?""

चांदनी उन्मळून पडली. मी तरी तिला कशी सावरणार ? माझ्यात तरी कुठे होतं त्राण ?

दुसऱ्याला फसवणाऱ्याला माणसाला पाहून जळणारी रुप आज खरंच जळून गेली होती..

तिचा हा शेवट मला मंजूर होता.

# कोंदण

दूरचा  वाजंत्रीचा आवाज जवळ जवळ यायला लागला. घरातली सगळी दाराबाहेर आली आणि वाट पाहायला लागली.. अस्पष्ट माणसं स्वच्छ दिसायला लागली. गावातल्या तरूणांनी मिरवणूकीनं आणलेल्या आपल्या मित्राला खाली उतरवलं. आणि तो तरूण आपल्या बापासमोर जाऊन उभा राहिला. छाती फुलवून, खुषीत हसत त्याने बापाच्या पायाला स्पर्श केला. बापाने आपल्या पोराला मिठीत घेतलं आणि गदगदत्या स्वरात त्याला म्हणाला,

'' आयुक्शाचं सोनं केलंस लेकरा. आपलं समदं कुल उजाळून निघालं जनु...

आईनं भाकरीचा तुकडा ओवाळून टाकल्यावर तो घरात गेला. बरोबर आणलेली दौलत बापाच्या पायावर घातली. हातातलं जड सोन्याचं कडं आईला दाखवलं. दोघांना साष्टांग दंडवत घातलं आणि आईबापाच्या डोळ्यातलं पाणी आपल्या हातानं पुसत पुसत म्हणाला.

'' अग माय, रडतीस कसापाय ? ह्येच तुला हवं होतं नव्हं ?

आईनं हसत मान डोलावली. आणि म्हणाली,

'' आरं बाळा, ह्ये आता आल्येलं पाणी हे जिवाचा थरकाप झाला होता, तवाचं हाय.. माज्या लेकराला काही झालं असतं मग ?. आई जगदंबेची कृपा म्हणून वाचलास माज्या राजा..

'' तुज्या दोल्यात पानी कायमच व्हायलं दुरपदे.. लेकरू वांड म्हनायचीस.. आणि ते घरला येईपर्यंत तुजा जिव सुपल्यासारखा पाखडला जाय. कुनी वाघरू तर न्हाई ह्याला घिऊन गेलं, कुन्या चोरानं तर न्हाई ह्याला पळिवलं, कुनाशी दांडगाईनं हानामारी करून मार खाऊन कुटं पडलं तर नसल ? आणि मंग बगावं तर ह्ये वीर यायचं की रमत गमत जंगलाच्या वाटेआडून.. सैतानाला कसलंबी भ्याच न्हाई. ' त्यावर सगळे हसले आणि म्हातारीसुध्दा हसली.

बेनं पार म्हाबलेश्वरापासून तळापर्यंतच्या कपाऱ्यातून हिंडलं आणि तरबेज झालं म्हनुन तर ह्यो दिस दिसला नव्हं ? माकडागत झाडावरून उतरलं, वाघाच्या दोल्यात डोळं घालून त्यालाबी पळवून लावात्यची ताकद होती या मर्दात . मामानं तलवारबाजी शिकीवली आणि म्हाराजांच्या सैन्यात शिरला म्हनुन आज ह्यो ही लक्ष्मी घिऊन आलाय ह्येच खरं. त्याच्या दांडगाईलाबी मिळाला बगा अवसर..''

‘‘ अवो, राजं जवळ करत्यात म्हनजीच मोट्ट सोन्याचं कडं मिळाल्यागत हाय. आपल्या गावातल्या मुलाचा यवडा मोठ्ठा सन्मान म्हणजी ह्यो लेक गावाचच भूशन हाय आणि वेगळं कौतुक काय कसापायी हवं. ?

‘‘ आय् तू येकदा मी वाचलो तर रडतीस तर मग आपल्या म्हाराजांच्या माय कितीवेळा रडलं. त्या जिजामाऊलीला बग, त्या कशा धीराच्या हाईत. ‘

म्हाताऱ्यांच्या गप्पा रंगत गेल्या आणि हा आपल्या सवंगड्यांसकट नाहीसा झाला. गावाबाहेर गेल्यावर एका खडकावर सगळी मित्रमंडळी बसली आणि सगळी त्याच्या पायाशी कोंडाळं करून बसली.

‘‘ आता सांग की लेका, काय काय झालं ते..आमास्नी समदं संगतवार सांग. कुनी काय म्हनतं, कुनी काय सांगतं, काय खरं काय खोटं कायबी कळत नव्हतं. ‘ सगळ्यांची उत्सुकता कमालीची ताणली गेली होती.

त्यानं एक मोठा श्वास घेतला आणि डोळ्यांसमोरून जे अजूनही हललं नव्हतं, ते सगळं तो जसंच्या तसं सांगायला लागला डोईचं मुंडासं त्यानं आपल्या मांडीवर ठेवलंन..आणि तो बोलायला लागला.

‘‘ लई धांदलीचं दिवस संकट घिऊनच आल्यावर काई चालत नाई बाबा... स्वामी होत्ये म्हनुनच सगळं निबावलं. स्वामींचं सगलं कसं यकदम शिस्तशीर. जराबी चूक व्हायाची न्हाई..एकेकाला काम द्येतात ते त्यानं पार पाडायलाच हवं असा दंडकच हाय त्यांचा. प्रान गेला तरी त्यांची आज्ञा होईपर्यंत, पुढचा सांगावा येईपावेतो थितंच उबं ठाकायाचं..असं वागावं लागतंय..परत एका कानाचं दुसऱ्या कानाला माहीत नसतंय..न्हाईतर गेले आपले हातपाय..नाहीतर कडेलोट.

त्यो दैत्य येनार ही कुनकुन स्वामींच्या कानावर आली आन् त्यांनी समदं वादळ अंगावर घ्यायाचं ठरिवलं. तंवाच आपल्ये त्ये सज्जनगडावरचं स्वामी न्हाईत का, तेंच्या गावोगाव फिरनाऱ्या शिष्यांनी बी वार्ता आणली म्हनत्यात. आनी त्यांनी स्वामींना इसारा बी दिला की जिवाला धोका हाय, तवा काय ठरवायचं त्यात पक्का ब्येत करावा. जीव घेयालाच तो बकासुर येनार हाय असं बी त्यात लिवलं हुतं म्हनत्यात.

तवा म्हाराज राजगड सोडून यकदम परताप गडावरच आलं. पन महाराज राजगडावरून परताप गडावर येन्याआदुगर समद्या शिलेदार शिपाई लोकांना सांगावा आला, आपल्या सरशेनापतींकडनं.

मग सगळ्या तरुणांची परीक्षा बी झाली. कुनी लवकर दमत होतं, कुनी हत्यार नीट चालवत नव्हतं, कुनी झटकन् निर्नय घेत नव्हतं, कुनी धावायला कमी पडत हुतं, कुनाला समदी हत्यारं चालवता येत न्हवती, कुनी कुस्तीत कमी पडत होतं. आसं करत करत थोड्याच शिपायांना वगळं काडलं. पन पत्याच लागु देत नव्हते की आमाला काय काम देनार हायेत ते. मला बी विचारलं, ‘ आजूबाजूचा परिसर म्हाईत हाय का म्हनून. म्या म्हनलं मी हितलाच म्हाबळेश्वरचा..हाय, हितल्या रानावनातच कायम हिंडलोय, आनी घरला फकस्त झोपायाच जात हुतो. मला हितला दगड अन् दगड म्हाईत हाय. ‘ मंग बरं म्हनाले.

आन् म्हाराज हितं आल्यावर परत गडावर बोलिवलं. परत माजी परीक्शा घितली आन् माजी चपळाई, तलवार, बिचवा, भाला, बंदुक, खांडा, कट्यार, पट्टा, वीटा, समदी हत्यारं चालवन्याचं कसब, ताकद बगुन म्हणाले की तुला लई जोखमीचं काम देनार हाहोत. जमल का? म्या म्हनलं, ‘ काय बी सांगा.. वाघरू पकडून आन म्हना तर त्येबी करायला मागं राहनार न्हाई.

‘‘ तुला काय काम देणार ते आम्ही तुला नंतर सांगू. ‘ असं म्हनले आन् मला थितंच राहायला सांगितलं.

‘‘ मंग त्यो खान पाह्यलास का? सवंगड्यानी विचारलं.

‘‘ त्यो कसला दिसतोय? पन त्याची फौज मातुर पाहिलि बाबा. अररंरं, वाईपासून पार डोंगरापावेतो पसरली हुती. केवडे हत्ती, घोडे, आन ऊंट रं बाबा. आपल्या धन्याचा कसा काय निबाव लागायचा आसं वाटलं बग मला. पण आपलं राजं म्हनजी सुर्याचा अंशच जनु. केवडं धाडस, केवडी हुशारी, केवडा विचार. जराबी डगमगले न्हईत. किती बारकाव्यानं विचार करनं, अबब! काय काय गोष्टी कानावर येत होत्या. आज काय वकील त्यांच्याकडून आला, उद्याला आपला वकील त्यांच्याकडं गेला. ‘

‘‘ कसं दिसत्यात रे राजे आपले? कदी पाह्यलेच नाईत आमी…आपल्या या नखाएवड्या गावात कशाला येनार राजं आपलं ‘

‘‘ हां! लई दरारा वाटतुया त्यानला पाहिलं की! आपली नजर पडली ना त्यांच्यावर, तर आपलं डोळंच आपल्या शरीराला आज्ञा देतंय, की वाक खाली. दरार असतोय, पन आदराचा हां? आपन आपोआप त्याच्यासमोर झुकतो. लई भरभर चालत्यात.. नजर वाघासारखी धाक दाखवणारी.. जसं काही यज्ञकुंडातून विस्तुव बाहेर पडून वाट चालतोय असं वाटतंय.. ‘

‘‘ आनि असा राजा तुला आपल्यासंग घिऊन गेला? पुन्यवान आहेस बाबा!

‘‘ व्हयं. मलाबी ज्या दिवशी कळालं की म्हाराजांबरोबर म्या सतत राहायचं हाय, तवा मलाबी असंच हा जलम धन्य जाल्यासारकं वाटलं बघ!

‘‘ आनि मग त्या दिवसाला काय काय झालं तेबी सांग की लवकर लवकर..‘

‘‘ सांगतो की.. बहिर्जीकाका रोजला नवीन नवी माहिती आणून देत होते. त्यांचं हेरखातं, गोसावी, भिकारी, ज्योतिषी, पाणके, आचारी बनून गनिमाच्या फौजेत घुसले होते आणि म्हाराजांना बातम्या पोचवत होते. आपली माणसंबी खानानं फौजेत ठिवली व्हती ना..त्यांच्याकडनं बी बातम्या लागायच्या..

खानाबरोबर बोलनी बी चालू होती. शेवटी त्या खानाला भेटायला म्हाराज जानार असं ठरलं. मोट्टा शामियानाबी बांधून झाला..मग कुनी कसं लढायचं, वागायचं, कुटं थांबायचं त्याचाही विचार पक्का झाला. सगळ्या सेनापतींना आपापल्या फौजेसकट म्हाराजांनी जागा पक्की ठरवून दिली. आमच्यातल्या काही मुलांना रानावनात झाडांवर लपून बसायला सांगितलं. अंधार झाल्यावर आपली मानसं ओळखायला यावीत, म्हणून त्यांना परवलीचा शबुद शिकवला. म्हणजे आपल्याच मानसाला आपन माराया नगं.

मग सगळ्यांना कर्णे कसे वाजतील, त्याचा अर्थ काय हेबी शिकवलं. तोफा कधी वाजणार, काय अर्थाच्या वाजणार तेबी लक्षात ठेवायला त्यांच्या त्यांच्या शेनापतीनी शिकविलं. संध्याकाळच्या सावल्या लांब व्हायाला लागल्या तवा, म्हाराज आपल्या महालातून बाहेर पडले. आम्ही बी त्याच्याबरोबर चालायला लागलो.

‘‘ तुमी म्हंजी कोन कोन रं ?“

‘‘ आमी म्हनजी संबाजी कावजी..आपला कोंडाळकर, सिद्दी इब्राहिम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, सूरजी काटके, जालंच तर कुष्णाजी गायकवाड, आणि आपला विसाजी मुरुंबकर, संबाजी करवर.. झालं का धा माणसं.. ? येवडेजन होतो म्हाराजांच्या भोवती..‘

‘‘ आनी मग ?.. तो आठवणीत रमला.

आणि मग ? मग नुसता पराक्रमाचा उत्सव. स्थळ-काळ-वेळ सगळं महाराजांच्या मनगटात रुतलेलं. थंडीचा महिना. मार्गशीर्ष शुध्द सप्तमी. सांजेची कलती वेळ. क्षितीजाला पोचलेल्या मलूल सूर्याच्या किरणांना सह्याद्रिच्या जंगलानं रोखून धरलं होतं. गडावरचा वाराही या प्रसंगाच्या ताणामुळे पडला होता. एरवी वाऱ्याच्या गुदगुल्यांनी हसणारी-डोलणारी झाडंही निमूटपणे काय होईल ते आता पाहायचं या भावनेनं स्तब्ध होती. सगळं खोरं मनात सावधतेचा दबा धरून साक्षीदार व्हायला उभं होतं .

सुष्ट आणि दुष्ट यांची उराउरी भेट होणार होती. महाराज झपाझप गडाच्या पायऱ्या उतरले. खानाच्या भोयांनी खानाची पालखी उचलली आणि शामियानाकडे चालायला लागले. रावणालाही दैत्य वाटावा असा धिप्पाड खान प्रेमाचं कोळिष्टक फेकून सावजाची वाट पाहात होता.

महाराज शामियान्याजवळ पोचले. आत बसलेला खान पुढे झाला. त्याने रायांना मिठी मारली. सत्व लहान-तम भयाण. दोघांची मिठी पडली. तामसानं मिठी आवळली. सत्व-रज दोन्ही घुसमटलं, पण महाराज भानावर आले. खान महाराजांच्या कुशीत कट्यार चालवत होता. त्यांचा अंगरखा फाटला पण आतलं हृदय चिलखतांनं शाबूत ठेवलं होतं. महाराजांनी आपली करामत सुरू केली. डाव्या हातातली वाघनखं खानाच्या पोटात रुतवली, आणि बिचव्याचं पातं खानाच्या पोटात खुपसलं. खानाची किंकाळी दऱ्याखोऱ्यात घुमली. दगा झाला होता.

खानानं पोशाखाच्या आत चिलखत घातलेलं नाही ही खबरही लागोलाग महाराजांकडं आपल्या लोकांनी पोचवली आणि महाराजांना वाचवण्यासाठीच ही बुध्दी भवानीदेवीनं दिली जणू. बातमी कळल्याबरोबर महाराज खूषीत हसले. महाराजांचं गुप्तहेरखातं एवढं तरबेज..

महाराजांच्या माणसांनी गडावर इशारा दिला. कर्णे काही वेगळंच सांगत आहेत, तोफांची भाषा तलवारी उपसायला सांगत आहे, हे सावध कानांनी ऐकलं. एका क्षणात हजारो तलवारी उपसल्या गेल्या. सापानं आपलं भक्ष्य गिळायला सुरूवात करावी तसं अंधारानं आसमंत गिळायला सुरूवात केली होती. त्या अंधारात सगळीकडे एका क्षणात झुंज सुरू झाली. जावळीच्या जंगलात लपलेले बांदल नाईक, पार घाटावर इशाऱ्याची वाट पाहणारे कान्होजी जेधे आणि

बाजी सर्जेराव, बोचेघोळीतले हैबतराव आणि बाळाजी शिळमकर, मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, पासलकर, ढमाले, सगळेच वीर..खानाच्या तळावर धावून गेले. पळून जाणाऱ्या खानाच्या एकट्यादुकट्या सैनिकांना, झाडांवर बसून राहिलेल्या मावळ्यांनी माकडागत पटापटा खाली उड्या मारून कापून काढलं. हिरवागार डोंगर रक्तानं लाल झाला.

जरीमोत्यांनी, मखमलीनं सजवलेल्या शामियानात खानाचा वकील कृष्णाजी भास्कर आपल्या धन्याला वाचवण्यासाठी महाराजांवर चालून आला. रायांनी त्याला रोखत म्हटलं, ‘ आमच्या हल्ला न करणे.. आम्ही ब्राह्मणावर शस्त्र चालवत नाही. पण स्वामीभक्त कृष्णाजींनी ऐकलं नाही. शेवटी महाराजांच्या तलवारीचा घास झाला आणि जमिनीवर कोसळला. इकडे फाटलेलं पोट हातांनी गच्च धरून हेलपाटत खान पालखीत बसला आणि भोयांनी दौडायला सूुवात केली हे पाहून संबाजी कावजी त्यांच्या मागे धावला आणि भोयांचे पाय कापूनच टाकले. सगळंच्या सगळं धूड खाली कोसळलं. बेभान संभाजीच्या रंध्रारंध्रात वीरश्री वहात होती. त्यानं मग खानाचं मुंडकंच कापलं. आणि तलवारीवर नाचवत आणलं.

इकडे महाराजांच्या रक्षणाला सगळी वीरश्री धावली. खानाचा माणूस सय्यद बंडा, राजांवर चालून आला.

‘‘ आन् लई जोरात कापाकापी सुरू झाली बगा. म्या बी लढत हुतो. इतक्यात पाहिलं, खानाचा माणूस स्वामींवर चालून येतोय तवा म्या पुडं झालो आणि क्षणात त्याला अंगावर घेत त्याचं मुंडकंच उडीवलं..त्याचं नाव सय्यद बंडा व्हतं म्हनं. ‘

हे सांगता सांगता आवेशानं जीवा महाला आताही उभा राहिला. त्या आठवणींनी त्याचं रक्त आताही उसळलं. आवाज मोठा झाला होता, मुठी वळल्या होत्या.

खानाला मारलं. शत्रू पळून गेला. युध्द संपलं. सुष्टाचा जय झाला. शत्रूला सहाय्य करणारांचे हातपाय कापले गेले, कुणाची मुंडकी उडवली गेली. राष्ट्रद्रोह करणारांची ही गत झाली आणि ज्यांनी वीरश्रीचा सन्मान केला त्यांना सन्मान मिळाला.

खजिन्यात खानाचं निशाण, ९५ हत्ती, ४००० घोडे, ७० तोफा, अगणित जडजवाहीर जमा झालं. गडावर खानाचे दोन जवाहिरे महाराजांच्या लोकांनी आपल्या ताब्यात ठेवले होते ते जवाहीर वेगळंच. पण ते राष्ट्राच्या खजिन्यात, महाराजांच्या नव्हे. महाराजांनी एकएक गड जिंकला, तेव्हाही त्याला नवीन सुंदर नावं दिली होती, पण आपल्या घरातल्या कुणाचं दिलं नव्हतं.

महाराजांनी आपला प्राणच स्वराज्याच्या पायाशी वाहिला होता.

‘‘ जिवा, आपल्या देशाचा प्रान म्हंजी म्हाराज आनि तु त्यांचं कोंदन बनलास गड्या..आणि ते बाकी दहाजन त्या कोंदणाच्या नख्याच बनले जनु.. म्हाराजांचा जीव आमच्या या कोंडावळ्याच्या जीवा महाल्यानं वाचिवला न्हाई का गड्यानु.. ?

म्हनजी होता जीवा म्हणून वाचला शिवा म्हन की..एकानं आनंदानं म्हटलं.

‘‘ व्हंय, म्हाराजांचं रक्शन कराया मिळालं म्हणून मलाबी धन्य धन्य वाटतुया गड्यानु. तगरीच्या साद्या फुलाला द्येवाच्या पायाशी जाऊन बसायला मिळाल्यागत वाटतया..‘

जीवाच्या गळ्यात गहिंवर दाटला होता.

# मनु आणि मोना

चैत्राच्या उष्म्याची झळ हळूहळू वाढायला लागली होती. कोकिळेच्या कुहूकुहूचा जागर पहाटेपासूनच सुरू झाला होता. घराघरात सोनचाफा, कवठी चाफा, मोगरा, फणस,आंबा, शेवगा, यांनी बहर धरला होता. त्यांच्या उग्र वासाने आसमंत घमघमला होता. गुढ्या-तोरणांनी घरं नटली होती. देवळांमधे रामजन्माच्या, हनुमानजयंतीच्या, कीर्तनांनी गजबज वाढली होती. आता महिनाभर राम, मारूति, जन्मोत्सवांनी, भजनांनी, टाळमृदुंगांच्या नादांनी देवळं दुमदुमणारच होती. अगदी अक्षय तृतीयेपर्यंत.. मग विवाहमुहूर्त..त्यांची धावपळ.

घराघरातल्या चैत्रगौरी पाळण्यांमधे नटून बसल्या होत्या. कुठे सोन्याचे, कुठे चांदीचे तर कुठे पितळेचे पाळणे देवघरात आले होते. चैत्रगौरीच्या हळदीकुंकवांना सुरूवात झाली होती. सरदार सावकारांच्या घरातले हौद भिजलेल्या हरभऱ्यांनी फुगले होते. शालू-शेले उन्हाच्या तिरपीत चमकायला लागले होते. रोज एकदोन घरची हळदीकुंकवाची आमंत्रण घेऊन गावातल्या स्त्रिया बाहेर पडत होत्या.

आज जोगांच्या घरी हळदीकुंकवाचं गावातल्या सगळ्या बायकांना आमंत्रण होतं. अनगळ सावकारांच्या पत्नी आपल्या तीन सुनांना घेऊन जोगांकडे निघाल्या. दोन पांढऱ्याशुभ्र घोड्यांच्या बग्गीतून चौघी निघाल्या. जोगवाड्यासमोर बग्गी उभी राहिली. त्यांना पहाताच जोगांच्या घरातल्या बायका लगबगीने बाहेर आल्या. लक्ष्मीबाई आणि त्यांच्या सुनांना घेऊन आत गेल्या. दिवाणखान्यात पसरलेल्या जाड जाजमावर बसलेल्या स्त्रियांनी त्यांना पाहिलं आणि त्या एकीकडे सरकून बसल्या. लक्ष्मीबाईंनी जमलेल्या बायकांकडे पाहून ओळखीचं स्मित केलं. कुणाचं क्षेमकुशल विचारलं. जोगांच्या घरातल्या बायकांची चौकशी केली. गावातल्या घडामोडींच्याही गप्पा झाल्या. कुणाच्याकडची माहेरवाशिण बाळंतीण झाली, कुणाचं लग्न ठरलं, किती हुंडा मागितला, कुणाकडचं कोण कैलासवासी झालं, आणि बारीक आवाजातल्या काही चमचमीत बातम्याही सगळ्यांनी अगदी खुलून खुलून सांगितल्या.

जोगांच्या वालुताई मुद्दाम त्यांच्याजवळ येऊन बसल्या. वालुताईंच्या सुना सोन्याच्या दागिन्यांनी वाकल्या होत्या. फक्त वालुताईंच्या अंगावर कमीत कमी दागिने होते. वालुताईंच्या सुनांनी मग सगळ्यांना हळदीकुंकू दिलं. ओटी भरली. नमस्कार केले. चांदीच्या उंच पेल्यांमधून पन्हं दिलं. लक्ष्मीबाईंनी पन्हं पिता पिता आत नजर टाकली. घरातल्या वृध्द आणि गतधवा स्त्रिया आतल्या खोलीतून बाहेरची मजा पाहात बसल्या होत्या.

जड,जड, वाकी, चंद्रहार, चिंचपेट्या, गोठ, पाटल्या बिल्वरांचं ओझं झालेल्या सावकारीणबाई जायला निघाल्या. त्यांच्या सुनाही पाठोपाठ उठल्या. मग लक्ष्मीबाई मुद्दाम आतल्या दालनाकडे वळल्या. आतल्या बायका सावरून उभ्या राहिल्या. त्यांच्यामधेच जोगांचा नातू आठ वर्षाचा माधवही उभा होता. नुकतीच त्याची मुंज झाली होती. लक्ष्मीबाई आत आल्या. प्रत्येकीशी दोन दोन शब्द बोलत लक्ष्मीबाईंनी विचारलं,

‘‘ मनकर्णिका कुठे दिसत नाही ती ? ’’ त्या वालूताईंना विचारत होत्या.

आपलं नाव ऐकून लाल आलवणातली सोळा वर्षाची मनकर्णिका हळूच पुढे आली. अनगळांची मथुरा आणि मनकर्णिका एकाच वयाच्या. दोघी जिवाभावाच्या बालमैत्रिणी. रात्री झोपण्यापुरत्या आपापल्या घरी असत. सागरगोटे खेळत, फुलं, दुर्वा गोळा करत दिवसभर हरताळकांसारख्या एकत्र हिंडत. बाराव्या वर्षी दोघींची लग्नही पाठोपाठ झाली. मथुरा सासरी रमली. तिचा संसार बहरला. नवकोट नारायण असलेल्या सावकारांकडे ती खरंच सौभाग्यवती होऊन गेली. आणि इकडे मनुचा संसार..?

मनुलाही सरदार घराणं मिळालं होतं. लग्न होऊन फक्त सप्तपदी झाली होती, आणि गर्भादानविधी व्हायचाच होता. एवढ्यात मनुवर आकाश कोसळलं. आठ दिवसात मनुचा नवरा सर्पदंशाने गेला. दोघींच्या प्राक्तनांच्या दिशा वेगळ्या झाल्या. हिरवा चुडा भरला काय आणि उतरला काय? बारा वर्षाच्या मनुला अजून लग्न म्हणजे काय याचीच ओळख झाली नव्हती. मनु माहेरी घरी आली. घरातल्या लोकांचे डोळे पाझरून पाझरून कोरडे झाले.

जगरहाटीचं चक्र परत सुरू झालं. मनु आपला दिवस घरकाम, विणकाम, यांच्या सहाय्याने संपवू लागली. भजनं म्हणावीत तर मनुनेच, देवतांची चित्र काढावीत ते मनुनेच, कशिदा काढावा तर मनुनेच. पद रचावीत तर मनुनेच. मनकर्णिकेचं घरातल्या सगळ्यांनाच कौतुक. पण बाहेर जायचं नाही.. शुभ कार्यात भाग घ्यायचा नाही..लाल लुगड्याशिवाय दुसरा रंग अंगाला लावायचा नाही.. मनु वठून गेली. घर माणसांनी भरलं होतं. नात्यांची जाळी एकमेकात गुंतली होती. काका-काकू, चुलत भावंड, आज्ज्या, कोकणातून आलेली काही आश्रित मुलं, माणसं खूप होती, पण मनु एकटी होती. घरातल्या प्रौढ गतधवांबरोबर तिनं आपलं अभाग्य स्वीकारलं होतं.

अशाच एका संध्याकाळी गावाकडचा निरोप घेऊन एक तरूण पाहुणा रात्रीच्या मुक्कामापुरता घरी आला. गवाक्षाच्या जाळीतून मनुने घोड्यावरून उतरतांना त्याला पाहिलं आणि मनुला आपण तरूण झालो आहोत याची जाणीव झाली. ओढ आकर्षण म्हणजे काय याची तिच्या देहाला ओळख झाली. आजवर ही अनावर भावना आपल्या मनात जिवंत आहे हे तिच्या गावीही नव्हतं. सगळी बंधनं झुगारून द्यावीत आणि त्या तरूणाच्या समोर जाऊन उभं राहावं या वेडानं ती सैरभैर झाली. पण लगेच भानावर आली. तो तरूण जेवून हात आचवायला विहीरीपाशी निघाला तेव्हा मनु त्याच्या वाटेत त्याला दिसेल अशी उभी राहिली. त्याची नजर तिच्याकडे गेली आणि दोघांचे डोळे एकमेकांमधे गुंतले. दोघांना एक क्षणच पुरेसा होता. इतक्यात बाकीचे पुरूषही यायला लागले आणि मनु पसार झाली.

दुसरे दिवशी तो तरूण पाहुणा निघून गेला. मनु मात्र स्वप्नांमधे रमली. आपल्या देहातही वसंत फुललाय याची तिला मनोमन ओळख झाली. ती हरखून गेली. त्यानं परत यावं, त्याला परत पहावं, या वेडानं बेचैन झाली. गप्प गप्प राहायला लागली. आणि अचानक येणाऱ्या गार सरींसारखा खरंच तो तरूण परत त्यांच्या वाड्याच्या दारात उभा होता. ती वेड्यासारखी दाराशी धावली. त्यानंही तिच्याकडे पाहून चोरटं स्मित केलं. तो तिच्यासाठीच आला होता, तिला पाहायला आला होता, हे न सांगताही त्याची नजर सगळं बोलून गेली..यावेळी तो चार दिवस राहिला. मनु सुखावली. कारणाशिवाय हसली. घरातल्या ज्या खोलीत तो जिथे असेल तिथे निमित्त काढून गेली. स्वतःच्याच नादात राहिली. आईनं हाक मारली तरी तिला ऐकू येईना, कामं निपटेनात, आपल्याला असं का होतंय तेही कळेना..

तो निघून गेला आणि मनु भानावर आली. आई आणि अप्पा आपल्याकडे करूण नजरेने बघतायत हे तिला जाणवलं..दोघंही गंभीर झाली होती. मनामनांचेही संवाद होतातच की! आई आणि आप्पांच्या मनातलं तिला स्पष्ट

ऐकायला आलं आणि तिच्या डोळ्यात पाणी आलं. त्यांनी अनेक पावसाळे पाहिले होते. तिला जाणवलं काका काकूंची नजरही बदलली आहे.. आपण एवढ्या भावना दडपल्या तरी या लोकांना त्या कशा कळल्या ? मनु घाबरली. हादरली. हे पाप आहे असं का म्हणतात ते तिला कळायला लागलं.

आणि अचानक तो पंधरा दिवसातच दारात येऊन उभा राहिला. काहीतरी निश्चयाने तो आला होता हे त्याच्या गंभीर चेहऱ्यावरून सगळ्यांनीच ओळखलं. मनु यावेळी त्याच्यासमोर गेली नाही..देवाच्या खोलीत धडधडत्या हृदयानं देवाचा धावा करत मन शांत करण्याचा प्रयत्न करत राहिली. माजघराचं दार बंद करून तो अप्पा आणि काकांशी काहीतरी बोलत राहिला. सैपाकघरातल्या सगळ्या बायकांचे कान त्या माजघराच्या दारालाच चिकटले होते. वरकरणी कुणीच काही बोलत नव्हतं.. मनु कुठे आहे हे मात्र सगळ्याजणी पाहून गेल्या. थोड्या वेळानं माजघराचं दार उघडलं. तो तरूण बाहेर आला आणि निघून गेला. मनुला आतल्या खोलीत बसून सगळं समजत होतं. घर शांत झालं. मनुच्या डोळ्यांमधून उष्ण कढ वाहायला लागले. इतक्त्ता हलक्या पावलांनी वालूताई आत आल्या. आणि मनुला जवळ घेत त्यांनी तिला सगळं सांगितलं. तो मनुशी लग्न करायच्या इच्छेने आला होता. अप्पा शास्त्रीबुवांकडे जातील आणि अशी पुनर्विवाहाची परवानगी आहे का हे विचारून येतील एवढं सांगून वालूताई उदासपणे कामाला निघून गेल्या.

दोन दिवस मनुचं लक्ष अप्पांच्या हालचालींकडेच लागलं होतं. अप्पा बाहेर पडतच नव्हते. आणि अचानक एके सकाळी अप्पांनी पगडी घातलेली आणि उपरणं अंगावर घेतलेलं मनुनं पाहिलं. अप्पा ज्या वेळेला बाहेर पडले त्या क्षणापासून मनु त्यांची वाट पाहायला लागली. आप्पा घरी आले पण त्यांची नजर खाली होती. उदास होती. आई त्यांच्यासमोर गेलेली मनुनं पाहिलं, आणि अप्पांनी मान निराशेनं हलवली हेही तिला दिसलं. त्या रात्री मनुची गादी आसवांनी ओली झाली होती. तो तरूण परत त्या घरात आला नाही. मनुनं वास्तव स्वीकारलं...

**शीलरक्षण आणि चारित्र्यरक्षण हे काचेच्या भांड्यासारखं जपायचं असतं हे घोकत मनाचा घट्ट खडक त्यावर दडपून ठेवून दिला...**

लक्ष्मीबाईंचा आवाज ऐकून मनु पुढे आली. मनुशी बोलून, मथुरेची संसाराची खुशाली सांगून लक्ष्मीबाई बाहेर पडण्यासाठी वळल्या. इतक्यात मनुला कसलीतरी आठवण झाली. तिने त्यांना थांबवलं. ती पटकन् आत गेली आणि सुती कपड्यात गुंडाळलेलं लालचुटुक काठाचं, गर्भरेशमी, काळ्या रंगाचं लुगडं तिने बाईंच्या हातात ठेवलं.

'' हे काय ?''

'' मथुरेनं मला ह्या लुगड्यावर कशिदा काढून द्यायला सांगितलं होतं. ते हे लुगडं.'' मनु गोड आवाजात म्हणाली.

लक्ष्मीबाई परत दालनात आल्या. त्यांनी लुगडं उलगडलं. त्याच्यावरचा सुंदर कशिदा पाहून जमलेल्या साऱ्याच हरखून गेल्या. नक्षत्रांनी आकाश नटावं तसं ते रेशमी वस्त्र सुंदर दिसत होतं. सगळ्यांनी मनुचं भरभरुन कौतुक केलं. मग ते वस्त्र परत बासनात गुंडाळून घेऊन अनगळांच्या बायका जायला निघाल्या.

'' अहो, अहो, ते लुगडं द्या ना! आमच्या मनुआत्याचं आहे ते. '' इतका वेळ सगळं ऐकत बसलेला माधव जोरात ओरडला. सगळ्यांच्या चकित झालेल्या नजरा आत वळल्या. तो तिथे आहे हे कुणाच्या लक्षातही आलं नव्हतं.

‘‘ हो ना! तिनंच दिलंय आम्हाला. ’’ गोड हसत सून म्हणाली.

‘‘मग तुम्ही कशाला नेताय ?’’ माधव आता चिडला होता.

‘‘ माधव, तू जा बघू बाहेर. तुझं काय काम इथे ?’’ माधवची आई त्याला रागावली.

‘‘ हो, पण हे आपल्या मनुआत्याचं आहे की नाही ? तिच्याच हातात असायचं ना सदानकदा.’’

‘‘ अरे, ते आपल्या मथुआत्याचं आहे. कशिदा काढायला आणलं होतं ते..’’ वालुताई माधवला आवरण्यासाठी धडपडत होत्या, आणि आपण खोटे पडत चाललोय हे पाहून माधव आणखीनच चिडत चालला होता. दिवाणखान्यातल्या बायकांचे चेहरेही कसेनुसे झाले. काय करावं ते कुणालाच कळेना. माधवला त्याची आई दंड धरून बाहेर ओढत न्यायला लागल्यावर मात्र माधव पिसाळला.

‘‘ नाही नाही! मनुताईचं नेसायचं लुगडं आहे ते.. मला नक्की माहीत आहे. . ’’ आपल्याला खोटं पाडण्याच्या अपमानानं तो चिडला. रडून, चेहरा लाल करत माधव ओरडला.

‘‘ काय करावं बाई या कार्ट्याला ? गप्प बस म्हटलं तर ऐकतच नाही आहेस तू..’’ त्याच्या पाठीत धपाटा घालत त्याची आई म्हणाली. तोपर्यंत सगळ्या समारंभाचा विचका झाला होता. मनुचे डोळे पाण्याने भरले होते. चेहरा अपराधी झालेला होता. तिच्या मनाची घुसमट तिच्या नजरेत व्याकुळली होती.

माधव या वाक्याने आणखीनच चिडला. ‘‘ मी अजिबात खोटं बोलत नाही आहे.. तरीसुध्दा तुम्ही सगळ्याजणी मला खोटं ठरवतांय.. पण मी खरंच पाहिलंय.. मनुताईला हे लुगडं नेसून आरसात पाहातांना..तिचं असल्याशिवाय नेसेल का ती ? ’’... माधव निर्वाणीने बोलला आणि क्षणात त्या दिवाणखान्यात जीवघेणी शांतता पसरली. ..

त्याचे शब्द सगळ्यांची ह्रदयं चिरत पार करून गेले. आकाश कोसळावं, वीजेचा लोळ घरातून आग लावत जावा, तशी अवस्था जमलेल्यांची झाली. मनुची तर धरणी पोटात घेईल तर बरं अशी अवस्था झाली. ती मटकन् खालीच बसली. तिचं शरीर थरथरायला लागलं. लाव्हारस पर्वताच्या उदरातून बाहेर फुटावा, तसं डोळ्यांमधलं कढत कारूण्य झरायला लागलं. हा घाव कुणालाच सहन होईना, त्यातून मार्ग कसा काढायचा हे ही सुचेना. .. .. ..

लक्ष्मीबाईच मग पुढे झाल्या. त्यांनी गदगदणाऱ्या मनुला उचलून छातीशी धरलं.. बांध फुटावा आणि पाण्याचा लोट त्यातून अस्ताव्यस्त वहायला लागावा तशी मनु ढसाढसा मोठ्याने रडायला लागली. ..

‘‘ मावशी चुकले ग! एकदाच नेसून पाहिलं मी हे लुगडं.’’ मनु रडत म्हणाली. त्या तिला तसाच थोपटत राहिल्या..

‘‘ रडू नकोस बाळा.. .. पराधीन आहोत ना आपण या पाशवी समाजापुढे ?..या कठोर धर्माचरणापुढे..’’

सगळ्यांच्या अंगातली शक्ती गेली होती. थोडा वेळ गेला, मग सगळं शांत झालं. .. ..वैधव्यात होरपळणाऱ्या, दिवसेंदिवस तरूण होत चाललेल्या या सुंदर मुलीकडे पाहून वालुताईचं मन करपत जायचं.. आज त्याला फुटून बाहेर पडायची संधी मिळाली. म्हणूनच मनुबरोबर त्यांनीही सौभाग्यलक्षणं तेवढी अंगावर ठेवली होती.

मनकर्णिकेसारख्या अशा मुद्दाम मिटवलेल्या कळ्या कितीतरी होत्या. झाडावर उंच टोकाला असणारं फूल ना कुणाच्या हाती पडतं, ना देवावर चढतं.. मनुसारख्या बालविधवा घरोघर होत्या.

'' निघतो आम्ही वालुताई..''

अनगळांच्या बायका निघाल्या. लक्ष्मीबाईंनी लुगडं हातात घेतलं.

''  अहो, मनुने नेसलेलं हे लुगडं आता अशुभ झालंय, तरीही नेताय?'' एक कर्मठ आवाज आला.

'' मनुनं एवढ्या प्रेमानं काढलेला कशिदा अशुभ कसा होईल  कमलाकाकू? कला कधी अपशकुनी असते का?'' लक्ष्मीबाईंनी रागावर ताबा ठेवत म्हटलं.

त्यांचे हे उच्चार ऐकून साऱ्या थक्क झाल्या. लक्ष्मीबाई आणि त्यांच्या सुना निघून गेल्या. सावकारांपेक्षा त्याच जास्त श्रीमंत आहेत..बाईचं हृदय सोन्याचं आहे..वालुताईंचं हे मत सगळ्यांनाच मनापासून पटलं होतं. ..

त्यानंतर जोगांच्या घरात परत हळदकुंकू झालं नाही..

माधवला तेव्हा या घटनेचा अर्थ कळला नव्हता, पण त्याच्या मनावर हा व्रण कायम कोरला गेला होता.. वाळीत टाकण्याची समाजाची धमकी झुगारून त्याने विधवा विवाह केला. त्यानं हट्टानं मनुताईच्या हातून बायकोची ओटी भरून घेतली. पण काळी चंद्रकला कधीही बायकोला घेऊ दिली नाही.

– – – –

घरात सगळीकडे पसारा पडला होता. मोठ्या मोठ्या दोन बॅगांची झाकणं उघडी पडलेली होती. थोडं सामान आत, थोडं बाहेर, थोडा ढीग, सगळाच पसारा बघवत नव्हता. कपडे, कागदपत्रं, मेकपचं सामान, बूटमोजे, सॅन्डल्स, %

..संध्याकाळ झाली तरी पसारा तसाच होता.

'' अग!  हे कधी आवरायचं?'' लक्ष्मीबाईंनी कॉटवर बसल्या बसल्या सुनेला विचारलं.

'' मोनिका येईल आता आणि भरेल तिची बॅग..'' सैपाकघरातून आशा मोनाचं खायचं सामान भरत म्हणाली.

''.. पण चालायलाही जागा नाहीयंय इथे.. मी उतरू तरी कशी? सकाळपासून आहे हा पसारा..''

'' अजिबात उतरू नका आता. काय हवंय तुम्हाला? मी देते ते. पण पसाऱ्यात चालाल आणि पडाल कुठेतरी.'' आशाने आतूनच दम भरला. लक्ष्मीबाई मग गप्प बसल्या.

'' गेली तरी कुठे ती?''

' ब्युटीपार्लरमधे गेली आहे.. केस कापून घ्यायचेत, फेशिअल करून घ्यायचंय, पाय स्वच्छ करायचेत, भुंवया नीट करायच्यात.. ..येईल एवढ्यात..'' आशा कावून म्हणाली.

'' काय करतात पार्ल्याला ?''

'' तुम्हाला नाही कळायचं ते.. आता चार महिने लंडनला जाते आहे तर चांगलं नको दिसायला ? तिकडे जाऊन हा खर्च कशााला करायचा ?''

'' अग, पण आज आवस आहे. आज केस कापणं अशुभ असतं..पुरूषही जात नाहीत केस कापायला..जायची कधी ती ?

'' कसली आवस आणि कसलं काय.. अर्थ आहे का त्या जुन्या रूढींना ?''

लक्ष्मीबाई काहीच बोल्या नाहीत. मग म्हणाल्या, '' लंडनमधे बरोबर आहे का कुणी ?''

'' आहेत की. ऑफीसमधले सहा लोक आहेत, आणि ही..''

'' म्हणजे मोना एकटीच मुलगी आणि सहा पुरूष.. इतक्या लांब तेही.. ?''

'' लहान आहे का ती ? मोठी ऑफीसर आहे म्हणून तर ऑफीसने तिची निवड केली आहे ना ट्रेनिंगसाठी ? जगातल्या तीस लोकांना निवडलंय त्यात आहे ती.. एवढं मुलासारखं शिक्षण दिलं, इंजिनिअर केलं तर मुलासारखं पाठवायला नको ?''

'' पण आता ही जाणार.. मग लग्नाचं कधी बघणार तिच्या ? अठ्‌टावीस वर्षाची होईल ना ती आता ?''

आशाला आपली चूक लक्षात आली. हे बोलायलाच नको होतं. आता या त्यावरच काळजी करत बसतील आणि आपल्याला पिडत राहतील. आता सुटका करून घ्यायची असेल तर बाहेरची कामं करून आलं पाहिजे हा विचार पक्का करून आशा बाहेर पडली. ती बाहेर पडली आणि लक्ष्मीबाई आपल्याच विचारात गढल्या. इतक्यात मोनिका आत आली. आत आली आणि सरळ बॅगेसमोर बसली. हातातून आणलेली लहान लहान पुडकी ती बॅगेत भरायला लागली. आजीचे डोळे आपल्यावर खिळलेले आहेत हे तिला पाठीला डोळे नसूनही कळत होतं. पण ती दुर्लक्ष करून काम करत बसली.

'' सगळे शर्ट आणि विजारीच दिसतायंत ? साडी एकच दिसतेय.'' वरून आजीचं लक्ष आपल्याकडेच आहे हे कळल्यावर मोना चिडून म्हणाली, '' तिथे कामाल जाते आहे..आजी..या कपड्यांनी किती सुटसुटीत वाटतं माहीत आहे का ? आणि ज्या देशात जायचं तिथले कपडे नकोत का करायला ?''

'' एकाने बोलायचं आणि बाकीच्यांनी री ओढायची असलं चाललंय तुमचं.. इंग्रज इथे आले तेव्हा नेसले का आपली धोतरं, बायका नेसल्या का नऊवारी लुगडी ?.. ते त्यांचं कधीच सोडत नाहीत, अगदी त्यांची भाषाही.. स्वतःचं सोडणारे तुम्हीच..''

'' आता जग बदलंलय आज्जी.. बरं मी आता आंघोळीला जाते. उरलेलं मग आवरते.''

‘‘ आत्ता? तिन्हीसांजेचं? आज आवस, अशुभ असतं ते..केस कापणं ही दुर्दैवी बायकांवरच, ही वेळ यायची..’’

‘‘ अग, आज्जी तुमच्या काळात अंधार असायचा.. तेव्हा तिन्हीसांजेला सगळं बंद करावं लागायचं काम.. आता उजेड बघ किती आहे.. आणि रात्रीची फ्लाईट आहे ..आता आंघोळ करीन म्हणजे पोचल्यावर नको..आता तो जुना काळ संपला..’’

‘‘ आता लग्न कधी करणार तू?’’

‘‘ आत्ता तर मला वेळच नाही..चांगला मुलगा मिळाला की मग बघू.. ..’’

‘‘ चांगला म्हणजे?’’

‘‘ माझ्यापेक्षा जास्त पगार असलेला, जास्त शिकलेला, आवडीनिवडी सारख्या असलेला..’’

‘‘ आणि तसा मिळाला नाही तर?’’

‘‘ राहीन एकटीच..करियर करायचंय मला. लग्न झालं की, नवरा..मग मुलं.. मग सासरची काय म्हणतील..ते लोढणं बाळगण्यापेक्षा एकटीच राहीन..’’

‘‘ संसार म्हणजे लोढणं? आधार नाही का वाटत तो? ’’ लक्ष्मीबाईंनी आश्चर्याने विचारलं.

‘‘ आधार कशाला हवा? मस्त पैसे मिळवावेत, खावं प्यावं मनाला येईल ते. पुरूषांनी नाही का हेच केलं, पैसे मिळवतात म्हणून? आता मीही तेच करीन .’’

‘‘ अग, पण बाईच्या जातीला आधार नको का?’’

‘‘ बाईची कसली आलीयंय जात आज्जी..? बायका दोन्ही करतात. घर पण चालवतात, नोकरीही करतात. पुरूषांनीच आता बदलून घ्यायला हवंय.. त्यांनाच स्वतःचा स्वतः सैपाक करून जेवता यायला हवंय..हातात चहा यायची वाट पाहाण्यापेक्षा आमच्या दोघांचा चहा करून वाट पाहाणारा नवरा हवाय मला..’’

मोनिकाचं फटाफटा बोलणं सहनच होईना लक्ष्मीबाईंना!

‘‘ कसं व्हायचं ग, तुमचं? लग्न नाही केलंस तर एकटेपणाचा नंतर कंटाळा येईल, आधाराची गरज वाटायला लागेल, तेव्हा काय करशील?’’

‘‘ ..अं.. तेव्हा एखादा कम्पॅनिअन शोधीन..म्हणजे सोबती..दोघं राहू..तो नाही मिळाला तर एखादं मूल दत्तक घेऊन राहीन..त्याला वाढवीन..’’ मोनिकाची उत्तरं तयार होती. लक्ष्मीबाई थक्क होऊन ऐकत होत्या. आज्जीचा प्रश्नांचा मारा संपल्यावर मोनिका फायलीत तोंड घालून बसली. मग परत बॅग भरायला लागली. कपडे, मेकपचं सामान, सेंटस्, क्रिम्स्, कामाचे कागद, दोन तीन जोड बूट..

त्या साऱ्या सामानाला आपण कुठे जातोय हे जसं माहीत नव्हतं, तसंच आपलंही झालंय असं लक्ष्मीबाईंना वाटलं. कुठे चाललोत आपण? आपले संस्कार, नीतीच्या कल्पना, रितीरिवाज, कुठे आणि कसं मोडत चाललंय याचाच त्यांना विचार पडला. मोनिकाला खूप प्रश्न विचारावेसे वाटत होते त्यांना, पण ती काय उत्तर देईल याचा नेम नव्हता आणि आपल्याला ते सहन होईल की नाही याचीही त्यांना खात्री वाटत नव्हती.

करियर, करियर म्हणजे नोकरीच ना? मग ती संसार सांभाळून केलेली नाही का चालत? संसाराची गरज हिला का वाटत नाही? मुलंबाळं असल्याचा आनंद मोठा का वाटत नाही? मूल दत्तक घेईन असं सहज म्हणाली ही.. मग पुरूषाचा स्पर्श त्याचा आधार का नको वाटतो या मुलींना, की इतके दिवस पुरूषी अहंकार जो मानला जायचा तो आता मिळवत्या झाल्याबरोबर मुलींमधेसुध्दा आला? ती म्हणाली ते किती खरंय! मुली दोन्ही क्षेत्र उत्तम चालवतात, मुलांनाच आता घर चालवणं शिकायला हवंय.. मग भावनिक गरजेचं काय? की स्पर्शसुखही, तेसुध्दा मुलामुलींना येता जाता मिळायला लागलं म्हणून त्याची ओढ कमी झाली? या भावनिक गरजेत एकमेकांना समजून घेणं बसतच नाही की काय?

लक्ष्मीबाईंच्या मनात काहूर माजलं. त्यांना काहीच कळेना. आता सगळंच खूप पुढे गेलंय एवढंच त्यांच्या कळलं.

किती बदल झाला मुलींच्या आयुष्यात शिक्षणाने..आपली स्थिती होती आणि आज काय झाली आहे.. आपल्यावेळी घरांच्या भिंती भावनांच्या होत्या आणि पैशाच्या ओढीपेक्षा मनाची ओढ त्यापलिकडे होती.

माधवरावांनी आपल्याशी लग्न केलं म्हणून आपल्याला किती विरोध सोसावा लागला होता समाजाचा..त्यांना मनुताईचं दु:ख कळलं म्हणून आपलं भाग्य तरी उजळलं. नाहीतर काय झालं असतं आपलं आयुष्य..? माधवरावांनी आपल्याला कधीही कशिदा काढू दिला नाही..एवढाच काय तो जुलूम..आपलं नावही लक्ष्मीबाई ठेवलं.

त्या घाबरल्या. परत आपण मागे चाललो का? की आणखी पुढे चाललो? त्या विचार करून दमल्या आणि झोपल्या. मोनिकालाही बरं वाटलं. कधीपासून तिला आजीची नजर खुपत होती. आपली उत्तरं तिला पचणार नाहीत याचीही कल्पना होती तिला. पण काय करणार?.. आजीला जगाबरोबर नेणं भागच होतं तिला.

आणि नव्वदीत पोचलेल्या आजी मनात म्हणत होत्या.. किती सहज सुधारक होतात या मुली..आणि आपण प्रवाहाविरूध्द पोहून समाजाचा रोष पत्करून पुढे गेलो होतो. हे मोनाला कुठे माहीत आहे..?

# देवच तुमचे रक्षण करो.

सबंध महाल लोकांनी ठेच भरला होता. सगळ्यांची उत्सुकता शिगेला पोचली होती. आपल्या देशाला, स्वराज्याला, गावाला, गल्लीला, डोंगर दऱ्यांना हिरवळीला याची देही, याचि डोळा पहाण्याची आज संधी मिळत होती. इतकं लांब, इतकं दीर्घ काळ राहिल्यावर आपल्याबद्दल लोक काय म्हणतात ते ऐकण्याचीही त्यांना उत्सुकता होती.

त्या अनोळखी माणसानं सी.डी. सुरू केली. हातातल्या छोट्या चपट्या डबीवरची बटणं दाबून तो पडद्यावर येणारी चित्र पुढे नेत होता, मागे आणत होता. सगळं बसल्या जागेवरून, न हलता. उपस्थितांमधल्या एकानं ते यंत्र हाताळत विचारलं, ' काय म्हणतात याला ? ' तो नवागत म्हणाला, ' रिमोट कंट्रोल'

' आणि या मोठ्या चौकोनी खोक्याला.'

' टेलिव्हिजन - टी.व्ही.जगात कुठेही काहीही घडलं तरी त्या क्षणी आपल्याला त्याच क्षणी ते दिसतं. आपण याला दूरदर्शनम्हणतो.'

' आमच्या वेळी नव्हतं असलं काही. पण थोडक्यात म्हणजे याला 'संजय उवाच ' म्हणायला हरकत नाही.'' ती वयोवृध्द मंडळी एकमेकातच बोलत होती.

'' संजय नाही! वेगवेगळ्या कंपन्या हे मशिन बनवतात, पण त्यातली कुठलीच कंपनी संजय नावाची नाही आहे.'' मुलगा नवीन पिढीतला आहे आणि नवीन पिढी कशी आहे ते सगळ्यांना लगेच कळलं.

'' आपल्या महाराष्ट्रात बनतं हे ?''

'' छे! आपल्या भारतात तांत्रिकी प्रगती होत नाही. आपले उद्योगपती या कंपन्यांबरोबर कोलॅबरेशन करतात आणि तो माल आपल्याकडे आणतात. हे सगळे शोध युरोप, अमेरिका आणि जपानमधे लागतात.''

'' आमच्या वेळी तांत्रिकी शिक्षण मिळत नव्हतं पण आता तर ते मिळतं ना ? मग आपले इंजिनिअर शोध का लावत नाहीत ?''

'' संशोधनाकडे कुणी वळत नाही, कारण त्यात पगार जास्त नसतो..आपली मुलं ज्या क्षेत्रात पैसा जास्त तिथेच जातात, भारतात पैसा नसेल तर अमेरिकेत जातात. अरब देशांमधे जातात. म्हणजे इंजिनिअर होतात आणि मॅनेजमेंट करतात. त्यात पगार जास्त आहे..'' नवागताने माहिती पुरवली.

'' म्हणजे शिक्षण आपण द्यायचं, खर्च आपण करायचा आणि त्याचा फायदा परदेशातल्या कंपनीनी घ्यायचा ? म्हणजे परकियांनी आपल्याला लुटलं ते अजून चालूच आहे म्हणायचं तेव्हा तसं आता असं..'' गोपाळरावांनी विचारलं. गोपाळरावांच्या बरोबरच इतरांच्याही चेहऱ्यावर काळजी पसरली.

मग फिल्म सुरू झाली. विमानातून सैर करावी तसं एकेक दृष्य आकाशातून पाहिल्यासारखं दिसायला लागलं. सर्वजण श्वास रोखून प्रत्येक दृष्य कौतुकाने पाहायला लागले. हेलिकॉप्टर मुंबईच्या विमानतळावरून उडालं. उडता उडता मुंबईचं दर्शन झालं. अथांग समुद्र दिसला. उंच उंच इमारती पाहून सगळे अचंबित झाले. देश कुठल्या कुठे गेला असं वाटलं सगळ्यांना..

'' ही मुंबई? मुंबई एवढी झाली आहे? एवढे मराठी लोक मुंबईत राहतात? आणि हे बारीक बारीक ठिपके कसले?

'' हे सगळे मराठी नाहीत. पुऱ्या भारतभरची मंडळी आहेत ही... आपले लोकच कमी आहेत. आणि हे बारीक ठिपके म्हणजे झोपडपट्टी आहे. लोक यात राहतात. त्यांना घराचे भाव परवडत नाहीत.''

'' एवढी लोकसंख्या? कुटुंबनियोजन वगैरेच काही भान आहे की नाही तुम्हाला?

'' खूप वाढली आहे आपली लोकसंख्या.. पण आपले राजकारणी त्यावर काहीही उपाय, मार्ग शोधत नाहीत..आयुष्यमानही वाढतंय.. सगळाच प्रॉब्लेम झाला आहे बघा. आणि लोक अजून मुलगा हवाच याच जुन्या मन:स्थितीत आहेत.. ''

'' सुशिक्षित आहात ना तुम्ही? मग?'' रघु आपली निराशा लपवूच शकला नाही..

नवागत काहीच बोला नाही.

दृष्य पुढे गेलं. सगळ्यांनी श्वास रोखला. मुंबईच्या रस्त्यांवरून कॅमेरा धावायला लागला.

'' गिरण्या कुठे गेल्या इतल्या. त्या उंच उंच चिमण्या दिसत नाहीत त्या? ''

'' गिरण्या मोडीत निघाल्या. गिरणी कामगार परत आपल्या गावी गेले. आता जमाना आहे तो गिरणी मालकांचा नाही तर बिल्डरांचा..सगळ्याच मोठ्या मोठ्या कंपन्या बाहेर गेल्या. कुणी गुजरातमधे कुणी कर्नाटकात..आता सगळीकडे मॉल आलेत. खाण्याचे परदेशी प्रकार आलेत. ''

'' ती पहा युनिव्हर्सिटी.. आपली युनिव्हर्सिटी..'' माधवराव आनंदाने म्हणाले.

'' आता या विद्यापीठापेक्षा खूप नवीन विद्यापीठं निघाली आहेत.. ..''

'' असं.. आपले लोक एवढे ज्ञानाचे वारकरी झालेत। कुणाची आहेत ही सारी विद्यापीठं? आम्ही केलेले कष्ट फळाला आले म्हणायचे.'' भाऊरावांनी आनंदाने विचारलं.

'' बरीचशी राजकारण्यांची.. काही उद्योजकांची..''

'' असं आपले राजकारणी एवढे हुशार झालेत? शिकलेले आहेत?''

'' राजकारणी आणि अभ्यास?'' नवागत जोरात हसला...'' ते तुमच्या काळातले बॅरिस्टर असणारे राजकारणी संपले महाराज आता..बॅरिस्टर शब्दाचा अर्थ किती राजकारण्यांना माहीत असेल याची शंकाच आहे..तुम्हाला काहीच माहिती नाही असं दिसतंय! हे लोक जेमतेम शिकलेत. काही आहेतही पदवीधर पण हा युनिव्हर्सिटी काढणारे सुशिक्षित आहेतच असं नाही. पण त्यांच्याकडे पैसा खूप आहे..मग तो पैसा ते ते यात घालतात आणि त्याचा दुप्पट पैसा करतात..'' या लोकांच्या अज्ञानाची, चेहऱ्यावरची कणव लपवत नवागत म्हणाला.

'' राजकारणी आणि पैसा? हे काय आणि नवीन लचांड?''

'' भ्रष्टाचार हो! ती तुमची जुन्या काळची रयत राहिली नाही आता.. भाऊराव..फार हुशार झाले आहेत लोक..बक्कळ पैसा करतात.. परदेशात नेऊन ठेवतात.. नव्हे दडवतात..''

'' पण आम्ही राजकारण केलं त्यात काहीच दौलत जमवली नाही..'' मोहनराव म्हणाले.

'' मोहनराव, आपण राजकारण केलं ती सुळावरची पोळी होती. म्हणूनच आपल्याला कुणी वारस मिळाला नाही. ना तुम्हाला, ना आम्हाला, ना ह्या विनायकाला.. ..'' सुपारी कातरीत बळवंतराव म्हणाले.

'' माफ करा हं! पण रागावणार नसलात तर सांगतो. ते तुमच्या काळातलं,स्वराज्य, स्वदेश, सहकार असले विषय चालत नाहीत आता .. तुमच्या त्या पार्ट्या, म्हणजे पक्ष, त्यांची तत्त्वं हेही कालबाह्य झालंय.. सगळे एकाच झाडावरचे पक्षी..सत्ता पाहिजे बघा आता सगळ्यांना..राजकारणी आता सुरक्षा अधिकाऱ्यांच्या गराड्यात चालतात, त्यांचा आणि जनतेचा संवादच नसतो, ते लोकांसाठी काहीच करत नाहीत..फक्त स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी..''

'' आमचे कसले पक्ष.. आम्ही सगळे फक्त झपाटलो होतो.. देश कसा पुढे न्यायचा यावरून आमची भांडणं होत होती.'' बळवंतराव म्हणाले.

'' हो! डोंगरीच्या तुरूंगात असतांना आमचे वाद सुरू झाले की जेलर यायचा आणि हळू बोला म्हणून सांगून तिथेच आमचे वाद ऐकत उभा राहायचा. आणि आमचे वाद तरी कसले हो, पैसा कसा उभा करायचा, वर्तमानपत्र कसं चालवायचं वगैरे..'' गोपाळराव म्हणाले.

'' या बळवंतरावांना वेडच लागलं होतं.. कुठलाही माणूस दिसला की त्याचा उपयोग स्वराज्यासाठी कसा करता येईल ह्याचाच विचार त्यांना पछाडून टाकायचा..''ज्योतीराव म्हणाले.

'' हे बघा, हे बघा, डोंगरांवरचे किल्ले.. महाराजांचे किल्ले..'' राज ओरडला.

'' आता पुण्याकडे चाललो आहोत.''नवागतानं माहिती पुरवली.

डोंगरदऱ्यांवरून हेलिकॉप्टर उडायला लागलं. आपला सह्याद्री. सगळ्याचं मन भरून आलं. पण काही डोंगर बोडके, काही गर्द झाडीचे.. घरं मात्र खूप..

'' हे पुणं! आणि ही मुठा!'' नवागतानं सांगितलं.

'' आं? ही इतकी घाणेरडी? माधवरावांचा विश्वासच बसेना त्यावर.

'' माधवराव, आणि हा कचरा बगा.. माजा हात तर लई शिवशिवायला लागलांय.. देश सोडला तवा किती स्वच्चता शिकवली होती म्यां, आनी ह्ये काय घान गाव.. शिकलेली मानसं नव्हं तुमी? मानसं काई काम करत्यात की न्हाई?'' देवुजी म्हणाले.

'' पगार खूप मिळतो, पण आपल्या लोकांना काम करायचा आळस खूप आहे. मग इतर प्रांतातले लोक येतात आणि मेहनत करून पैसा मिळवतात, आणि आपल्या गावी पाठवतात..''

'' अहो ही रस्त्यावरची माणसं, या मुली पाहिल्यात का?''

'' गोपाळराव, या ऑफीसला जाणाऱ्या मुली पाहा! आनंद होईल तुम्हाला, यांचा पोशाख पाहिल्यावर.'' बि.जी. म्हणाले.

'' खरंच की. हेच म्हणत होतो मी असे सुटसुटीत कपडे घातले की किती छान दिसतं ना? हालचाली करायला किती सोपं जातं.. आणि ही मुलगी स्वतःच्या मुलीला घेऊन चाललेली दिसते आहे, पण नवरा कुठे आहे हिचा?''

'' अहो! हल्ली मुलींचा कल लग्नाच्या बंधनात न अडकता, दत्तक मूल घ्यायचं आणि एकडं रहायचं याकडे वाढलाय. तो नवरा, सासरची माणसं, वादावादी यापेक्षा मुली शिकतात, छान कमावतात आणि एकट्या राहतात..आता थोडं आहे प्रमाण..पण एक दिवस येईल असा की हे घरोघर दिसेल..'' नवागत म्हणला.

नवागताची ही माहिती ऐकून सगळेच चमकले.

'' धोंडोपंत काय हो हे? तुम्ही पाहिला होतात का भविष्यकाळ?'' गोपाळरावांनी मान नकारार्थी हलवली. ''आम्ही त्याचं कष्टमय जिणं पाहात होतो. शिक्षणाने पैसे मिळतील, मुली कमवायला लागती, त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावं लागणार नाही, एवढीच झेप होती आमच्या स्वप्नांची..''

'' तसंच झालंय.. मुली खूप हुशार झाल्यात्, मोठ्या कंपन्यांच्या मोठ्या हुद्यावर काम करतात, मोठाले पगार मिळवतात, शिवाय छान संसार करतात, मुलांना छान वाढवतात, छान रहातात.''

'' आपल्या देशात लोकशाही आहे ना?''

'' कसली लोकशाही राव! मतदारांना पैसा देतात, दारू देतात, बायांना साडीचोळी देतात, आणि निवडून येतात.. मग पाच वर्षात सात पिढ्यांचं कमावतात..''

'' आणि आपल्या देशातल्या कामगारांची काय स्थिती? कोण आहेत कामगार नेते?''

अमृतरावांनी उत्सुकतेने विचारलं.

'' कसले नेते राव! सगळे विकाऊ.. खरं सांगू का? तुम्हाला काहीच कल्पना नाही.. आता ऐका.. मोहनराव, तुम्ही स्वदेशी मालासाठी जीव पाखडलात पण परदेशी मालाने आपल्या गिळून टाकलंय.. भाऊराव, तुम्ही शिक्षणासाठी

झगडलात पण शिक्षण खेड्यापर्यंत पोचलेलंच नाही अजून.. उलट सुशिक्षितांची, धनाढ्य लोकांची मुलं, लायकी नसतांना लाखो रूपये भरून डॉक्टर-इंजिनिअर होतात आणि मग लोकांना लुटतात..रघुनाथराव कुटुंबनियोजनात आपण पार हरलोत.. देवुजी, आताचे कचऱ्याचे प्रकार पाहिलेत तर डोकंच फिरेल तुमचं..किती सफाई करणार, किती झाडू संपवणार, किती घाण उपसणार हो तुम्ही ? आणि तुम्ही हो, अंधश्रध्दानिर्मूलनवाले, अजून आपल्या देशातले नरबळी तसेच चालू आहेत, त्याचा कायदाच बनत नाही आहे.. तुमचं रक्तच उसळेल ह्या अंधश्रध्दा पाहिल्या तर! आणि तुम्ही रे पोरांनो, उगाच जीव गमावलात बघा तुम्ही!''

'' अरे, पण कुणी पेटून उठतं की नाही ? काय करतात तुमचे तरूण ? '' विनायकाने विचारलं.

'' अहो, कसलं आलंय रक्तबिक्त ? स्वाभिमान आहे कुठे आम्हाला ? आमच्या परमपूज्य महाराजांचं नाव दिलेल्या बोरीबंदर स्टेशनलाही आम्ही सिएसटी म्हणतो, म्हणजे छत्रपती शिवाजी टर्मिनस..''

'' आम्हाला तर काहीच ऐकवत नाही आहे हे! परत देशात परतलं पाहिजे आम्हाला!''

'' कशाला येताय ? तुम्ही सगळे त्यापेक्षा युरोप-अमेरिकेत जा. ते देश बघा. तिथे प्रत्येक नागरीक नियम पाळतो, स्वच्छता पाळतो, त्यांच्या देशात कणभरही कचरा नाही. सगळीकडे शिस्त, विज्ञानावर भर, देशप्रेम, स्वाभिमान, बघून या एकदा युरोप, अमेरिका, चीन, जपान.''

'' भयानकच आहे चित्र आपल्या महाराष्ट्राचं .. लोकसंख्या, घाण, पाणी-शेती- आरोग्यातली निराशा..राजकारणी. ..केवढ्या समस्या ह्या..'' भगत रागाने म्हणाला.

'' अहो, रागावू नका, चिडूही नका. आपल्या देशात येऊन एकदा निवडणुकीला उभे रहा म्हणजे किती पैसा लागतो ते कळेल. लोकांना प्रबोधन आवडत नाही हो! तरूणांना शिस्त आवडत नाही. नुसती वाहनांची शिस्त पाळत नाहीत आपले तरूण, आचार-विचारांची काय पाळणार ?

'' असू दे! आम्ही आपल्याच देशात येणार..निर्धार आहे आमच्या सगळ्यांचा.'' गोपाळराव, देवुजी, रघु, भाऊ, ज्योतीराव, भीमराव धोंडोपंत, सगळेच एकदम म्हणाले.

'' आता एकच करतो. आमचं महाराष्ट्रात जायचं ठरलंय हे आमच्या गुरूंच्या कानावर घालून येतो.

'' गुरू कोण ?''

'' तुमच्या भाषेत सांगायचं तर सिएसबी म्हणजे छत्रपती शिवाजीराव भोसले यांच्या कानावर, म्हणजे आपले महाराज. बरं झालं तुम्ही आपल्या महाराष्ट्राची सीडी वरती आम्हाला दाखवायला आणलीत. म्हणूनच आमचे डोळे उघडले. भाऊराव कुत्सितपणे म्हणाले.

नवागतानं कपाळाला हात लावला. फुले, आगरकर, कर्वे, भाऊराव पाटील, ज्योतिबा फुले, कर्वे, रघुनाथ कर्वे यांचा उत्साह पाहून नवागत म्हणाला,

'' कमालच आहे तुमची. देवच तुमचं रक्षण करो. मला वाटलं होतं की ही फिल्म पाहून तुम्हाला निराशा येईल. पण तुमचा परत तिथेच जन्म घेण्याचा निर्धार पाहून वाटतंय की आता मीही तुमच्याबरोबर तिथेच जन्म घेतो. नाही तर परत त्या देशात जन्मावंस वाटत नव्हतं.' तो तरूण म्हणाला.

'' चल तर मग आमच्याबरोबर, परत भारतात जन्मायला. आम्हीच तुझं रक्षण करू. आता जरा तुझ्या त्या टी.व्ही. त चमकून कामं करू.'' सगळे म्हणाले.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. पण तो केवळ टाईमपास नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान